मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १२० ■ बुधवार, ०७ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# महामार्ग प्रकल्पामुळे नाशिक केवळ धार्मिक शहर नाही, औद्योगिक व लॉजिस्टिक्स हब बनणार

**दैनिक युवक आधार**

**नाशिक :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या ३७४ किलोमीटर लांबीच्या महामार्गाला मंजुरी देण्यात आली असून, सुमारे १९,१४२ कोटी रुपयांची ही महत्त्वाकांक्षी योजना बीओटी (टोल) मॉडेलवर राबविली जाणार आहे. विशेष बाब म्हणजे या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाला थेट आर्थिक भार उचलावा लागणार नाही. दोन वर्षांत पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पामुळे नाशिकचा संपर्क पश्चिम आणि दक्षिण भारताशी अधिक बळकट होणार आहे.

**केवळ धार्मिक शहर नव्हे, तर लॉजिस्टिक्स हब**

आजही अनेकांच्या मनात नाशिक म्हणजे कुंभमेळा, रामतीर्थ आणि वाइन कॅपिटल अशीच प्रतिमा आहे. मात्र, गेल्या दशकात नाशिकने औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात लक्षणीय झेप घेतली आहे. अंबड, सातपूर, सिन्नर, इगतपुरी, दिंडोरी परिसरांत उद्योगांचा विस्तार होत असताना, दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा हा मोठा अडथळा होता. नाशिक–सोलापूर–अक्कलकोट कॉरिडॉर हा अडथळा दूर करण्यासाठी महत्त्वाची कडी ठरणार आहे.

हा ग्रीनफिल्ड कॉरिडॉर दिल्ली–मुंबई एक्स्प्रेस-वे, आग्रा–मुंबई महामार्ग (एनएच-६०) आणि समृद्धी महामार्गाशी थेट जोडला जाणार आहे. परिणामी, नाशिक थेट देशातील प्रमुख औद्योगिक व बंदरांशी जोडले जाईल. विशेषतः वाढवण पोर्ट इंटरचेंजशी होणारे कनेक्शन नाशिकच्या निर्यातक्षम उद्योगांना नवी दिशा देणारे ठरेल.

**वेळ, अंतर आणि खर्चात मोठी बचत**

या कॉरिडॉरमुळे प्रवासाच्या वेळेत सुमारे १७ तासांची बचत होणार आहे, तर अंतर तब्बल २०१ किलोमीटरने कमी होणार आहे. ही आकडेवारी केवळ तांत्रिक नाही, तर त्यामागे उद्योगांचा खर्च, वाहतुकीचा वेग, इंधन बचत आणि पर्यावरणीय परिणाम यांचा मोठा संदर्भ आहे. सध्याच्या तुलनेत सुमारे ४५ टक्के वेळेची बचत होणार असल्यामुळे नाशिकमधील उद्योगांची स्पर्धात्मकता वाढणार आहे.

१०० किमी प्रतितास डिझाइन स्पीड आणि १२० किमी प्रतितास क्षमतेनुसार डिझाइन केलेला हा ॲक्सेस कंट्रोल्ड महामार्ग अपघातांचे प्रमाण कमी करेल. वाहतूक सुरळीत झाल्यामुळे शेतमाल, औद्योगिक उत्पादन आणि प्रवासी वाहतूक अधिक सुरक्षित आणि वेगवान होईल.

**शेती आणि द्राक्ष उद्योगाला नवे बळ**

नाशिक जिल्हा हा द्राक्ष, कांदा, भाजीपाला आणि प्रक्रिया उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. मात्र, वेळेत बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यात येणाऱ्या अडचणींमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते. या कॉरिडॉरमुळे नाशिकचा शेतमाल थेट दक्षिण भारतातील बाजारपेठांपर्यंत कमी वेळेत पोहोचू शकणार आहे. कोल्ड चेन लॉजिस्टिक्स, ॲग्रो प्रोसेसिंग आणि वेअरहाउसिंगसाठी नाशिकमध्ये गुंतवणूक वाढण्याची मोठी शक्यता आहे.

**रोजगार आणि स्थानिक विकास**

या महामार्गाच्या उभारणीमुळे थेट आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या हजारो संधी निर्माण होतील. बांधकाम काळात स्थानिक युवकांना काम मिळेलच, शिवाय पुढील टप्प्यात हॉटेल, ट्रान्स्पोर्ट, वेअरहाउस, लॉजिस्टिक्स पार्क, पेट्रोल-सीएनजी पंप, इलेक्ट्रिक चार्जिंग सर्व्हिस सेंटर्स यांसारख्या सेवा उद्योगांचा विस्तार होईल. नाशिक–अहिल्यानगर–धाराशिव–सोलापूर या पट्ट्यातील ग्रामीण भागाच्या आर्थिक प्रवाहाला चालना मिळेल.

**बीओटी मॉडेल आणि पायाभूत सुविधांमधील बदल**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नमूद केल्याप्रमाणे हा आतापर्यंतचा सर्वात मोठा बीओटी (बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर) प्रकल्प आहे. या मॉडेलच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर रेल्वे आणि इतर पायाभूत क्षेत्रांतही हे मॉडेल वापरले जाणार आहे. यामुळे खासगी गुंतवणूक आकर्षित होऊन सार्वजनिक प्रकल्प वेगाने पूर्ण होतील.

**जमीन अधिग्रहण : महत्त्वाचा टप्पा पार**

या प्रकल्पासाठी ३,१२२ हेक्टर जमीन अधिग्रहणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. त्यासाठी ३,८५३ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. ८० टक्के जमीन प्रत्यक्षात ताब्यात आली असून, उर्वरित अधिग्रहण प्रक्रियाही अंतिम टप्प्यात आहे. काही ठिकाणी अडथळे असले, तरी प्रशासनाने ते मार्गी लावण्याची तयारी दर्शविली आहे. ही बाब महत्त्वाची कारण प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी जमीन अधिग्रहण हा निर्णायक घटक असतो.या महामार्ग प्रकल्पाचा आणखी महत्त्वाचा पैलू म्हणजे शाश्वत विकासाचा दृष्टिकोन. ग्रीनफिल्ड ॲक्सेस कंट्रोल्ड कॉरिडॉर उभारताना पर्यावरणीय प्रभाव कमी ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.

# स्त्री शक्ती फाउंडेशनचा भारतीय जनता पक्षास जाहीर पाठिंबा

## अपक्ष उमेदवार विजया कदम यांची अधिकृत घोषणा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीतील कळंबोली प्रभाग क्रमांक ८ (क) येथून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत असलेल्या स्त्री शक्ती फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा विजया चंद्रकांत कदम यांनी भारतीय जनता पक्षास जाहीर पाठिंबा देत असल्याची अधिकृत घोषणा केली आहे. त्या आशयाचे पाठींबा पत्र त्यांनी आज (दि. ०६) लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केला. सामाजिक कार्य, महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण तसेच स्थानिक नागरी विकास या क्षेत्रांत सातत्याने कार्य करत असताना, कार्यसम्राट आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या सक्षम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने पनवेल व कळंबोली परिसरात राबवलेल्या विविध विकासकामांवर आपला ठाम विश्वास असल्याचे विजया कदम यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर, कोणत्याही प्रकारच्या राजकीय दबावाविना, पूर्ण वैचारिक स्पष्टता आणि स्वेच्छेने, मी माझ्या सर्व सहकाऱ्यांसह भारतीय जनता पक्षाला जाहीर पाठिंबा देत असल्याचे त्यांनी सांगितले. हा पाठिंबा



स्वाभिमान, जबाबदारी, पारदर्शकता आणि जनहित या मूल्यांवर आधारित असल्याचेही त्यांनी नमूद केले. पनवेल व कळंबोलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्व घटकांनी एकत्र येऊन, सकारात्मक, विकासाभिमुख आणि पारदर्शक कार्य करू, असे आवाहन विजया कदम यांनी करून पनवेल महापालिका निवडणुकीसाठी स्त्री शक्ती फाउंडेशनचा पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, तसेच भाजप युतीच्या उमेदवारांनी त्यांचे आभार मानले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उमेदवार अमर पाटील, बबन मुकादम, रविंद्र भगत, राजेंद्रकुमार शर्मा, विजय खानावकर, बायजा बारगजे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# सामाजिक न्याय विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**खोपोली प्रतिनिधी :** सामाजिक न्याय विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग अधिनस्त शासकीय वस्तीगृहातील मुला-मुलींचे व अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्धाटन श्री बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग यांच्या शुभहस्ते दिनांक 6 जानेवारी 2026 रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.









या कार्यक्रमास श्री किशोर पाटील, कार्यवाह खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ खोपोली, श्री संतोष जंगम ,अध्यक्ष खालापूर तालुका प्रसारक मंडळ खोपोली, श्री जितेश ठक्कर , अध्यक्ष, बी एल पाटील तंत्रनिकेतन कौन्सिल, श्री प्रशांत माने, प्राचार्य बी एल पाटील तंत्रनिकेतन खोपोली, श्री दीपक घाटे, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रत्नागिरी, श्री संतोष चिकने, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सिंधुदुर्ग, श्री पांडुरंग वाबळे, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण पालघर, श्री समाधान इंगळे, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण ठाणे, श्री रविकिरण पाटील, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण मुंबई शहर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

खोपोली येथे सामाजिक न्याय विभागाच्या मुंबई विभागीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन दिनांक 6 व 7 जानेवारी 2026 रोजी करण्यात आले आहे. या क्रीडा महोत्सवास मुंबई शहर मुंबई उपनगर ठाणे पालघर रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील सुमारे 400 हून अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी व कर्मचारी सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत कबड्डी खो-खो, बॅडमिंटन, हॉलीबॉल, क्रिकेट इत्यादी खेळांचा समावेश करण्यात आला आहे. या संपूर्ण स्पर्धेचे आयोजन श्री सुनील जाधव, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रम 7 जानेवारी 2026 रोजी आयोजित करण्यात आला आहे.




# प्रभाग १६ ड मध्ये गृहनिर्माण व पुनर्विकास प्रश्नांवर अपक्ष उमेदवार मल्लिनाथ गायकवाड आक्रमक

## अनधिकृत इमारती नियमितीकरण व बंद परवानग्या सुरू करण्याचा ठाम निर्धार

## जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी वाढीव FSI व स्पष्ट धोरणाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १६ (ड) मधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उतरलेले मल्लिनाथ शंकरराव गायकवाड यांनी CIDCO प्रशासनाच्या धोरणांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आपल्या जाहीर संकल्पनाम्यात त्यांनी प्रामुख्याने गृहनिर्माण, पुनर्विकास आणि नागरिकांच्या मालकी हक्काशी संबंधित मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडली आहे.CIDCO च्या परवानगीने उभ्या राहिलेल्या बहुसदनिका व गाळे असलेल्या इमारतींना कोणताही दंड न आकारता नियमित करण्याची मागणी गायकवाड यांनी केली आहे. नागरिकांच्या चुकीशिवाय वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवलेल्या या विषयामुळे हजारो कुटुंबे अडचणीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच गेली ७ ते ८ वर्षे बंद असलेल्या बंगलो टाईप भूखंडांवरील सर्व परवानग्या तात्काळ सुरू करण्यासाठी CIDCO प्रशासनाला भाग पाडणार असल्याचा ठाम दावा त्यांनी केला आहे. याचबरोबर सोसायटी सभासद यादी अद्ययावत करताना कोणतेही हस्तांतरण शुल्क आकारू नये, हीही त्यांची प्रमुख मागणी आहे.प्रभागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी वाढीव FSI सह परवानगी मिळवून देण्याचे आश्वासन देत, CIDCO आणि पनवेल महानगरपालिकेचे स्पष्ट व एकसंध पुनर्विकास धोरण निश्चित करून घेण्यासाठी जनआंदोलन उभारण्याची भूमिका त्यांनी जाहीर केली आहे. तसेच पुढे बोलताना गायकवाड म्हणाले की, गेली 5 वर्षे महापौर पद या प्रभागातील नगरसेविकेकडे असूनही येथील पाण्याचा प्रश्न, बंगलो टाईपच्या इमारतीमधील सदनिका, गाळे यांचे हस्तांतर का सुरू होवू शकले नाही, अव्वाच्या सव्वा मालमत्ता कराची आकारणी करताना विरोध का केला गेला नाही, परिवहन सेवा का अद्याप सुरू झाल्या नाहीत. ऑटो रिक्षा प्रवासी वाहतूक मीटरप्रमाणे का सुरू झाल्या नाहीत. रस्त्यावरील खड्ड्यांच्या समस्या अजूनही आहेत.

पार्कींगचा प्रश्न सुद्धा निकाली निघाला नाही. या सर्व प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी सुज्ञ मतदार प्रभाग क्र.16 मध्ये विजयी करतील असा त्यांनी ठामविश्वास व्यक्त केला आहे.निवडून आल्यावर महिलांना 500 रुपये मध्ये गॅस सिलेंडर मिळून देणार असे जाहीर मल्लिनाथ गायकवाड यांनी केले

# भाजप प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाणांचे वादग्रस्त विधान भाजपला पडणार महागात

## लातुर महानगर पालिका जाणार कुणाकडे .... ?

**दैनिक युवक आधार**

**लातूर प्रतिनिधी ( जेग्रद्र सोमवंशी ) :** लातूर भाजपमध्ये उफाळलेली प्रचंड नाराजी, विकास करण्यात आलेले अपयश पाहता जनतेसमोर विकासाचा काहीही अजेंडा न ठेवता भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी चक्क लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांचे नांव पुसण्याचे वादग्रस्त विधान करून भाजपच्या अडचणी वाढविल्या आहेत, उद्योग, व्यापार, सहकार, शिक्षण अशा क्षेत्रासह अल्पावधीत लातूरचा चौफेर विकास लोकनेते विलासरावांनी साधला. राज्याला एक वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम त्यांनी केले. पक्ष दिरहीत राजकारणांचा मापदंड निर्माण केला. त्यांच्याविषयी खालच्या पातळीवर बोलून नवीन वादाला तोंड फोडले आहे.

किंबहुना काँग्रेस हा मुद्दा राजकीय भांडवल करणार आहे. या माध्यमातून त्यांना आयते कोलीत मिळाले आहे.15ऑगस्ट 1982 ला पूर्वीच्या उस्मानाबाद (आताचे धाराशिव) जिल्ह्यातून लातूर जिल्ह्याची निर्मिती झाली. तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी नवीन लातूर जिल्ह्याची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर मागे वळून न पाहता लोकनेते विलासराव देशमूख यांनी विकासाची घोडदौड कायम ठेवली. प्रत्येक खाते सांभाळताना आणि राज्याचे मुख्यमंत्री असताना विकासाचा पहिला पास लातूरला दिला. जे नवं ते लातूरला



हवं याचा शेवटच्या श्वासापर्यंत ध्यास घेतला. त्यांच्या योगदानातून मागास मराठवाडयातील लातूरने सहकार, शिक्षण, उद्योग, व्यापार, आरोग्य अशा विविध क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

शिक्षणासह उद्योग, व्यवसायासाठी असलेली संधी आणि पोषक वातावरण पाहता राज्याचे लक्ष लातूरकडे लागले. इतकेच नव्हे तर त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात राज्याला वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम केले.

**काँग्रेस मनपा निवडणूकीत करणार भांडवल...**

विरोधकांनाही आपले वाटावे असे दिलखुलास व्यक्तीमत्व म्हणून विलासरावांची राजकीय पटलावर छाप होती. राजकारणातील मंडळी त्यांचे वकृत्य, कर्तृत्व आणि नेतृत्व विसरू शकत नाहीत. त्यांनी लातूरच्या विकासात दिलेले योगदान, त्यांचे विकासाचे व्हिजन लातूरकर कधीही विसरू शकत नाही असेच आहे. लोकनेते विलासराव देशमुख आणि लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची मैत्री राजकारण पलीकडे होते. दोघांनी कधीही पक्ष अभिनिवेश बाळगला नाही. त्याच नेत्यांनी निर्माण केलेला मापदंड समोर ठेवून अनेक नेते राजकारणात आपली वाटचाल करीत आहेत.

असे असताना लातूर महानगरपालिकेच्या निवडणूकीच्या प्रचारासाठी आलेते भाजपचे अतिउत्साही प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना लातूरच काय महाराष्ट्रातील जनता लोकनेते विलासरावांनी दिलेले योगदान विसरू शकत नाही, हे ठावूक नसावे म्हणजे लजास्पद आहे. हिमालयाच्या उंचीचे असलेले लोकनेते विलासराव देशमूख यांचे लातूरकरांच्या हृदयात असलेले नांव

**मुख्यमंत्री फडणवीसांच्या भूमिकेकडे लक्ष**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी विलासरावांचे नांव पुसण्याचे वादग्रस्त वक्तव्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. त्यात महानगरपालिकेच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 7 जानेवारीला लातूर शहरात येत आहेत. त्यामुळे ते या विधानाची कशी सारखा सारव करणार याकडे हे पहावे लागणार आहे. काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लातूर जिल्हा परिषदेच्या आवारात उभारण्यात आलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळयाच्या अनावरणासाठी आले होते. त्यावेळी याच आवारातील लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळयाला वंदन करीत लोकनेत्यांवरची निष्ठा दाखवून दिली होती. मात्र त्याच पक्षातील अतिउत्साही प्रदेशाध्यक्ष त्याविरुद्ध कृती करतात. असा विरोधास भाजपमध्ये दिसून येत आहे.

आणि योगदान पुसून काढण्याची भाषा करीत आहेत. हे लातूरकर कदापिही सहन करणार नाहीत.

एकप्रकारे त्यांचे हे वादग्रस्त विधान काँग्रेसच्या पथ्यावर पडणार आहे. भाजपमधील बंडाळी,निष्ठावंतामध्ये उमेदवारी डावलल्यावरून असलेला असंतोष दूर करण्याऐवजी भाजप सत्तेपासून कसे दूर राहील असे भाष्य चव्हाण करून ते गेले आहेत.

## वाहतूक नियमांबाबत जनजागृतीसाठी नव्हा शेवा वाहतूक शाखेचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**सायली साळुंके/उरण शहर प्रतिनिधी :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या नव्हा शेवा वाहतूक शाखेच्या वतीने ०३ जानेवारी २०२५ रोजी रेझिंग डे निमित्त पी.यू.बी. चौक, नाव्हा शेवा येथे वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात तुकाराम हरी वाजेकर विद्यालयाचे आर.एस.पी. (रस्ता सुरक्षा पेट्रोल) विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. कार्यक्रमादरम्यान सुमारे १५ ते २० वाहनचालकांना थांबवून त्यांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी वाहनचालकांना दारू पिऊन वाहन



चालवू नये, सिग्नल जंप करू नये तसेच वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळावा अशा महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.वाहतूक नियमांचे महत्त्व अधोरेखित करत रस्ते अपघात टाळणे व सुरक्षित वाहतुकीची सवय निर्माण करणे, हाच या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. परंपरेतून शिस्त, शिस्तीतून सुरक्षितता—हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

## उरण नगरपरिषदेची सभा ही लाईव्हच होणार:नगराध्यक्षा भावना घाणेकर

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** बाळशास्त्री जांभेकर यांनी पत्रकारितेत जो ठसा उमटविला. अशा पत्रकारितेत तुम्हीही कायम राहाल. लोकांचे प्रश्न मांडाल. तुमच्या लेखणीला आणि वाणीला बळ मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना करते असे भावनात्मक उद्गार नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांनी काढले. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीच्या व पत्रकार दिनानिमित्ताने मंगळवारी (दि.६) उरण नगरपरिषदेच्या सभागृहात पत्रकारांचा सन्मान करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर बोलत होत्या.

याप्रसंगी तालुक्यातील वृत्तपत्रांचे व वृत्त वाहिन्यांचे पत्रकार तसेच नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात पत्रकारांना सन्मानित करण्यात आले. यापुढे नगरपरिषदेच्या कारभाराबाबत बोलताना भावना घाणेकर यांनी सांगितले की संसद लाईव्ह होते. अधिवेशन लाईव्ह होते. तशीच उरण नगर परिषदेची सभा ही यापुढे लाईव्हच होणार. कारण जनतेचे काम करत असताना लोकांमध्ये गैरसमज पसरू नये, आणि करत असलेले कामकाज हे जनतेला पारदर्शक दिसावे. यासाठी यापुढील सर्व सभा या लाईव्ह होतील. ज्या नेत्यांनी, ज्या कार्यकर्त्यांनी, ज्या मतदारांनी आम्हा सर्वांना आमच्यावर विश्वास टाकून, आम्हाला निवडून आणण्यासाठी जे परिश्रम घेतले. त्यांना या नगर परिषदेचे कामकाज हे पारदर्शक दिसले पाहिजे. यासाठी आमचा नेहमीच प्रामाणिक



प्रयत्न राहील. लोकांना पारदर्शकता दाखवायची असेल तर प्रत्येक सभा ही लाईव्ह होणे अपेक्षित आहे.

असे सांगूनत्या पुढे म्हणाल्या कचऱ्याचे ढीग, दूषित पाणी आणि नागरिकांनी दिलेली समस्यांची निवेदने याबाबत मुख्याधिकाऱ्यांना प्रश्न विचारले असता, ते मुख्याधिकारी जर समाधानकारक उत्तर द्यायला तयार नसतील तर आम्हाला कायदेशीर मार्गाने जावे लागेल. लाईव्ह सभेची त्यांना सवय नसेल, कॅमेऱ्याची सवय नसेल तर त्यांनी ती सवय करून घ्यायला हवी. नाहीतर त्यांनी मिटींगला येऊच नये. यासाठी लाईव्ह सभेची कॅमेऱ्याची सवय करून घ्या. आणि लोकांचे प्रश्न लोकांना कळू द्यात. लोकांचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यांच्या समस्या महत्त्वाच्या आहेत. आम्हाला जनतेचे काम करताना कोणी अडचण निर्माण करू नये. कोणाकडून अडचण निर्माण होत असेल तर आम्ही कायदेशीर मार्गाने जाऊ. आणि जनतेच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न करू. असे नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी शेवटी स्पष्ट केले. यावेळी उपस्थित उरण तालुका दैनिक पत्रकार संघाच्या वतीने नगराध्यक्षाना पत्रकारांना नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीत पत्रकारकक्ष निर्माण करून त्यांना वृत्तसंकलनासाठी जागा उपलब्ध करूनद्यावी म्हणून निवेदन देण्यात आले

## श्रीम कोठेकर योगिता यांच्या ‘ शिदोरी संस्काराची’ या पुस्तकाचे ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**मुबंई प्रतिनिधी :** श्रीम कोठेकर योगिता यांच्या ‘ शिदोरी संस्काराची’ या पुस्तकाचे ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रकाशन करण्यात आले विद्यार्थ्यांना मूल्यांचे महत्व सांगणारे पुस्तक म्हणजे शिदोरी संस्काराची . श्रीम कोठेकर योगिता या शिवभूमी विद्यालय प्राथमिक विभागाच्या शिक्षिका यांचे ४ थे पुस्तक ‘शिदोरी संस्काराची ’ याचे प्रकाशन रविवार, दिनांक ०४ जानेवारी २०२६ रोजी ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथील प्रकाशन कट्टा आणि कविकट्टावरती मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रकाशन



कट्टा प्रमुख घनश्याम पाटील, कविकट्टा अध्यक्ष राजन लाखे, उपशिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे, कोठवळे मॅडम, सौ कारंजकर , श्री माडगूळकर सर महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड कार्यकारिणी सदस्य किरण लाखे आणि सुनीता बोडस यांची प्रमुख उपस्थिती होती. ‘मूल्यांचे संवर्धन करणारे हे पुस्तक’ विद्यार्थी, पालकांसाठी उपयुक्त ठरणार आहे असे जेष्ठ साहित्यीकांनी आपले मत मांडले.

‘शिदोरीसंस्काराची’ याशीर्षकातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतांना त्यांच्या जवळ असणारा मूल्यांचा ठेवा , समाजात जीवन जगतांना पावलोपावली आपले वर्तन,आचार विचार दाखवणारा मार्ग,जीवनाला दिशा देणारे,परिवर्तन घडवून आणणारे , चांगला संदेश देणारे ,सकारात्मक दृष्टीकोन वाढवणारे असे हे पुस्तक आहे यातील चारोळया अत्यंत समर्पक शैलीत मांडल्या आहेत. निसर्ग, इतिहास, अध्यात्मिक मूल्य , कौशल्य आणि शिक्षण यांचा सुरेख संगम या चारोळ्यांच्या माध्यमातून दिसून येतो.

श्रीम कोठेकर योगिता या शिक्षिका, कवयित्री, लेखिका म्हणून परिचित आहे. त्यांची आजवर चार पुस्तके प्रकाशित आहेत. ‘ काव्ययोग ‘ मनातल्या कविता’, ‘ संस्कार शिदोरी’, आमचे अभिमान ’ यासारखी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. त्यांचे अनुभव,अध्ययन अध्यापन,विविध शिक्षण परिषदा, साहित्य संमेलने आणि कार्यशाळांतील सहभाग त्यांच्या लेखनाला व्यापक दृष्टिकोन देतो.विद्यार्थ्यांमध्येही त्यांनी कविता लेखनाची आवड निर्माण केली आहे. "शिदोरी संस्काराची" हे पुस्तक नक्कीच येणाऱ्या भावी पिढीसाठी मूल्यवर्धनाचे काम करेल अशी आशा अनेक साहित्यीकांनी व्यक्त केली आहे व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत

## भाजपा–शिवसेना व आरपीआय युतीच्या वार्ड क्रमांक १२८ मधील अधिकृत उमेदवार सौ. अश्विनीताई दीपक बाबा हांडे यांच्या प्रचारार्थ उभारण्यात आलेल्या पक्ष कार्यालयाचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**विकास वायाळ/मुबंई प्रतिनिधी :** या उद्घाटन कार्यक्रमाला भाजपचे ईशान्य मुंबई जिल्हा महामंत्री तसेच दयावान, डॅशिंग व कार्यसम्राट आमदार श्रीराम कदम साहेब यांचे प्रतिनिधी श्री चंद्रकांत मालकर साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच शिवसेना विभाग प्रमुख श्री दीपक बाबा हांडे साहेब, उपविभाग प्रमुख श्री संतोष उर्फ बाबुशेठ शेठ साळुंखे साहेब, श्री प्रवीण विचारे साहेब, श्री बाळासाहेब हांडे साहेब, श्री वैभव पाटील साहेब, श्री अनिकेत खेतले, श्री विजय भोसले, श्री राजू शिरसेकर यांच्यासह युतीतील विविध पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सौ. अश्विनीताई हांडे यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा देत, युतीच्या माध्यमातून वार्ड क्रमांक १२८ मध्ये



विकासाचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमात कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आगामी निवडणुकीत युतीचा उमेदवार निश्चितपणे विजयी होईल, असा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम ची शस्त्र अधिनियम अन्वये शेलु बाजार येथे कारवाई

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी वाशिम जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्या पासून अनेक उपक्रम हाती घेतले. तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकीचे अनुषंगाने निवडणूक शांतता प्रिय व निर्वीघ्नपणे पार पाडणे करिता जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्या करिता अवैध दार, जुगार, गुटखा तसेच शस्त्र अधिनियम प्रकरणी कार्यवाही करून गुन्हेगारांना वचक निर्माण केली आहे.

पोलीस अधीक्षक अनुज तारे, यांच्या आदेशानुसार वाशिम जिल्हा मध्ये आगामी काळात निवडणुका पार पडणार असून निवडणुकीचे काळामध्ये शांतता अबाधित राहावी या दृष्टीने शस्त्र अधिनियम च्या कार्यवाही



करण्याकरिता आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मंगरूळपीर हद्दीतील शेलुबाजार येथे दिनांक ०५/०१/२०२६ रोजी सोनू उर्फ शेख राजिक शेख मोहम्मद वय २४ वर्ष रा.शेलू बाजार ता. मंगरूळपिर जि. वाशिम हा त्याची राहते घरामध्ये तलवार बाळगून असल्याबाबत गुप्त माहिती मिळाल्या वरून स्थानिक गुन्हे शाखा वाशिम च्या टीमने सदर आरोपीचे घराची पंचायत समक्ष झडती घेतली असता घरामध्ये एक लोखंडी तलवार मिळून आली. त्यावरून सदर इसम विरुद्ध पोलीस स्टेशन मंगरूळपीर येथे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर कार्यवाहीमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक अनुज तारे अपर पोलीस अधीक्षक लता फड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक प्रदीप परदेशी, पोउपनि शेखर मास्कर, पोहवा राहुल व्यवहारे,पोअं /राजकुमार यादव,भूषण ठाकरे ,अविनाश वाढे,तुषार ठाकरे,शुभम चौधरी ,पो अंमलदार सुनील प्रभू तायडे यांनी केली.

## भा.मा. कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती व बालिका दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजितसिंह ठाकुर :** रिसोड तालुक्यातील एकमेव नाविन्यपूर्ण उपक्रम राबणारी भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात 3 जानेवारी रोजी सामाजिक क्रांतीच्या अग्रदूत पहिल्या स्त्री शिक्षिका व मुख्याध्यापिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची 195 वी जयंती एक आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करत असताना महाविद्यालयाच्या आदरणीय प्राचार्या मंजुषा सु. देशमुख मॅडम, व सन्माननीय पर्यवेक्षक सुनील डहाळके सर यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाच्या अध्यक्ष कु.सिद्धी तायडे, व प्रमुख अतिथी कु. किरण कैलास पवार, कु. लक्ष्मी गवळी , सेजल तिडके या सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रथमतः प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर इयत्ता पाचवी ते बारावी च्या हजारो विद्यार्थिनींच्या उपस्थितीत कार्यक्रम साजरा करत असताना विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या वेशभूषेत प्रथमतः उत्कृष्ट लघु नाटिका सादर करत श्रोत्यांना अंतर्मुख करत तसेच प्रबोधनात्मक गीतांच्या माध्यमातून मंत्रमुग्ध केले, एक वैचारिक जयंती साजरी करताना सावित्रीमाईच्या संघर्षमय जीवनगाथा आपल्या प्रखड विचारातून कथन करताना जयंतीदिनी समस्त भारतीय स्त्रियांनी आपल्या सावित्रीबाईंचा वारसा लाभलेला आहे. त्यातून आपण आपला नसून, सबला झाल्या आहोत. याची जाणीव ठेवली पाहिजे. त्यांनी केलेल्या कार्याच्या प्रेरणेतून आपणही इतर स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांच्या पंखात बळ देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असा सम्यक संकल्प करूया तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण त्यांच्या कार्य अन विचारांना जागृत ठेवून त्यांच्या जन्मदिनी त्यांना कोटी कोटी अभिवादन करू असे आपल्या भाषणातून प्रखर विचार व्यक्त केले. त्याचप्रमाणे कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी कु.किरण कैलास पवार हिने सावित्रीमाईंच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकतात ज्यांच्यामुळे आज महिला ताठ मानेने राहत आहे, अनेक क्षेत्रात आपल्या प्रतिभा आणि प्रतिमेचा ठसा उमटत आहेत. ही केवळ सावित्रीबाईंची देन आहे असे आपले प्रकट विचार व्यक्त केले. दुसऱ्या प्रमुख अतिथी कु. लक्ष्मी गवळी व कु.सेजल तिडके यांनी आपल्या विचार व्यक्त करताना



स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा नव्हे तर दोन पावले पुढे आहे, परंतु या मागच्या प्रेरणा कोण आहेत हे कधी माहीत करून घेण्याचा प्रयत्न केला आहे का? हा प्रश्न आपल्या या वैचारिक भाषणातून प्रेक्षकांना केला. त्यानंतर प्रमुख अध्यक्ष कु. सिद्धी तायडे या विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या संघर्षमय जीवनाची गाथा सांगत असताना सती प्रथा केशव पण अशा प्रथा बंद करत सन 1853 झाली बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले व सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालविले. प्रमुख अतिथी आदरणीय पर्यवेक्षक सुनील डाहाळके सर यांनी सावित्रीमाई फुले यांच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 1955 सालापासून 3 जानेवारी हा सावित्रीमाईंचा जन्मदिन बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. व सर्व बालिकेंनी शेवटी सावित्रीमाईंच्या जन्मदिनी मंगलमय शुभेच्छा दिल्या. शेवटी आपल्या प्रमुख मार्गदर्शनाने भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या मंजुषा सु.देशमुख मॅडम यांनी सावित्रीमाईच्या जीवन संघर्षावर प्रकाश टाकताना ज्या सावित्रीमाईनी स्त्री शिक्षणाचा पाया 1 जानेवारी 1848 भिडे वाड्यात पहिली शाळा काढून घातला. त्या सावित्रीमाईंचा आज मात्र संपूर्ण महिला वर्गाला विसर पडला आहे. अलीकडे काही जण सरस्वती ही विद्येची देवता नसून सावित्रीमाईच विद्येची देवता आहे, असे म्हणत आहेत परंतु त्यांना देवता म्हणणे हा त्यांचा अवमान आहे. आज पर्यंत कोणताही देव किंवा देवता स्त्री शुद्राच्या मदतीला धावून आली नाही. मग त्यांनी शिक्षण देणे तर दूरच म्हणूनच त्या देवता नसून, क्रांतीज्योती आहेत. असे प्रखर मत आपल्या वैचारिक भाषणातून व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षिका शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.वैशाली खोडके व प्रीती गिरी यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु. लक्ष्मी खंडागळे हिने केले.

## पनवेल महापालिका निवडणुकीत शेकाप, शिवसेनेलाला मोठा धक्का

### काळुंद्रेतील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीला दिवसेंदिवस धक्के बसत असून, विशेषतः शेतकरी कामगार पक्षाची (शेकाप) अवस्था बिकट होत चालली आहे. याचाच प्रत्यय आज पुन्हा आला असून, काळुंद्रे गावातील शेकाप व शिवसेनेच्याच्या सक्रिय कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.



काळुंद्रे येथील शेकापचे सक्रिय कार्यकर्ते व काळुंद्रे प्रकल्पग्रस्त संघटनेचे उपाध्यक्ष संतोष बळीराम म्हसकर, ज्येष्ठ कार्यकर्ते बाजीराव मधुकर घरत, अनिल धाऊ म्हात्रे, शिवसेना ठाकरे गटाचे अविनाश मधुकर म्हसकर, तसेच काळुंद्रे सिडको महिला मंडळाच्या राजकुमारी हिरालाल मीना, पुष्पा पाटील, श्री महिला बचत गटाच्या स्वाती जाधव, विनिक्षा कासार, मोनाली शिंदे, ज्युली सिंग, अनिता सिंग, मणिमाला गणेशन, अकलोशी मीना, कलादेवी, पिंकी मीना यांनी त्यांच्या समर्थकांसह आज (दि. ६) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा, प्रभाग २० अध्यक्ष रघुनाथ बहिरा, ज्येष्ठ कार्यकर्ते शंकर म्हात्रे, काळुंद्रे गाव अध्यक्ष बाळाराम चिखलेकर, बूथ अध्यक्ष विशाल म्हसकर, नरेश घरत, सचिन चिखलेकर, ज्येष्ठ कार्यकर्त्या कल्पना पाटील, प्रभाग २० युवा अध्यक्ष विकास म्हसकर, सतीश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. काळुंद्रे गाव प्रभाग क्रमांक २० मध्ये येत असून, या प्रभागातून अजय बहिरा व प्रियांका कांडपिळे हे दोन उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. उर्वरित एका जागेसाठी भाजप महायुतीच्या उमेदवार श्वेता बहिरा निवडणूक लढवत असून, या पक्षप्रवेशाचा त्यांना निश्चितच लाभ होणार असल्याचे बोलले जात आहे.

# गंगापूर धरणग्रस्त आदिवासींच्या घरांवरील कारवाई तत्काळ थांबवा

## अन्यथा राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडणार

**दैनिक युवक आधार**
**कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत) नाशिक :** गंगापूर धरणामुळे विस्थापित झालेल्या आणि गेल्या ७० वर्षांपासून ब्राम्हणवाडे व महादेवपूर परिसरात वास्तव्यास असलेल्या आदिवासी कोळी महादेव समाजाच्या घरांवर पाटबंधारे विभागाकडून केल्या जाणाऱ्या अतिक्रमण कारवाईचा आदिवासी उलगुलान सेनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रभाकर फसाळे आणि महात्मा रावण किंग फाउंडेशन व आदिवासी शासन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष श्री. दत्ताभाऊ झनकर यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. प्रशासनाने ही अन्यायकारक कारवाई न थांबवल्यास संपूर्ण राज्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा या दोन्ही संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे.

**७० वर्षांपासूनचे वास्तव्य आणि प्रशासनाचा विश्वासघात**

यावेळी बोलताना प्रभाकर फसाळे म्हणाले की, धरण उभारणीच्या वेळी



प्रशासनाने या आदिवासी कुटुंबांना "तुमच्या घरावरून कोणीही उठवू शकणार नाही" असे आश्वासन दिले होते. मात्र, आज अनेक वर्षांनंतर अचानक कोणतीही पूर्वसूचना न देता पाटबंधारे विभागाने घरांना 'अतिक्रमण' ठरवून नोटिसा बजावल्या आहेत. पिढ्यानपिढ्यांच्या जमिनी धरणासाठी देऊनही आज स्वतःच्या हक्काच्या घरांसाठी या कुटुंबांना संघर्ष करावा लागत आहे, हा आदिवासी समाजावर मोठा अन्याय आहे.

**न्यायालयीन प्रक्रिया आणि प्रशासकीय अनास्था**

या प्रकरणावर रहिवाशांनी नाशिक येथील दिवाणी न्यायालयात धाव घेतली असून (दावा क्रमांक ६६६/२०२३) हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयातून नोटीस बजावूनही पाटबंधारे विभागाचे अधिकारी सुनावणीला हजर राहत नसल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. जोपर्यंत न्यायालयाचा अंतिम निकाल लागत नाही, तोपर्यंत प्रशासनाने कोणतीही बळाचा वापर करून कारवाई करू नये, अशी कायदेशीर मागणी संघटनेतर्फे करण्यात आली आहे.

**ग्रामपंचायतीच्या सुविधा आणि कर भरणा**

दत्ताभाऊ झनकर यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सांगितले की, ज्या घरांना महादेवपूर ग्रामपंचायतीने वीज, पाणी, रेशन कार्ड आणि आधार कार्ड यांसारख्या अधिकृत सुविधा दिल्या आहेत आणि जिथे नागरिक नियमित घरपट्टी भरतात, त्यांना 'अतिक्रमण' म्हणणे हास्यास्पद आहे. प्रशासनाने विकासाच्या नावाखाली आदिवासींचे सर्वस्व हिरावून घेतले असून आता त्यांना रस्त्यावर आणण्याचे काम सुरू आहे. आमच्या जमिनी जर परत केल्या, तर आम्ही ही जागा सोडण्यास तयार आहोत, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

**आक्रमक आंदोलनाचा इशारा**

जर पाटबंधारे विभागाने आपली दडपशाही थांबवली नाही आणि आदिवासींच्या घरांवर कारवाई करण्याचा प्रयत्न केला, तर 'आदिवासी उलगुलान सेना' आणि 'महात्मा रावण किंग फाउंडेशन' रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष करेल. या संघर्षातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सर्वस्वी शासन आणि पाटबंधारे विभाग जबाबदार असेल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी आहे स्वाक्षरी केलेली आहे.

या संदर्भात लवकरच मुख्यमंत्री आणि संबंधित खात्याच्या मंत्र्यांची भेट घेऊन न्यायाची मागणी करण्यात येणार आहे.

## कामोठे चेकनाका येथे सतरा लाखांची रोकड जप्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी आचारसंहिता लागू झाली आहे. यानुसार पनवेल मतदारसंघ, निवडणूक विभागांतर्गत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिर सर्वेक्षण पथक क्रमांक 3 (एसएसटी पथक) ने पनवेलजवळील कामोठे चेकनाका येथे नियमित वाहन तपासताना सायन पनवेल हायवे रोडवरून जाणाऱ्या ग्रॅन्ड विटारा पांढऱ्या रंगाच्या गाडीची तपासणी केली. यात कापडी पिशवीमध्ये 17 लाखाची रोख रक्कम आढळून आली. ही रक्कम संशयास्पद असल्याने ही रक्कम पथकामार्फत जप्त करण्यात आली.ही कारवाई पनवेल



महानगरपालिका निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रभाग 11, 12, 13 चे निवडणूक निर्णय अधिकारी अविशकुमार सोनोने यांच्याद्वारे ही तक्रार देण्यात आली. या कारवाईवेळी आचारसंहिता पथक प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, समन्वय अधिकारी तथा उपायुक्त रविकिरण घोडके, समन्वयक तथा अधिक्षक मनोज चव्हाण, पथक प्रमुख स्थिर सर्वेक्षण पथक क्र. 3 ग्रामविकास अधिकारी, सुदिन धनाजी पाटील, पथक सदस्य नरेंद्र गावंड, प्रशांत फडके, कामोठे पोलिस स्टेशनचे पोलिस शिपाई जितेश नवघरे, श्रीवंता अक्षय सुर्यवंशी उपस्थित होते. या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी आयकर विभागास सूचित करण्यात आले असून त्याच्यावतीने पुढील प्रक्रिया सुरू आहे. पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अनुषंगाने स्थिर सर्वेक्षण पथक, भरारी पथक, व्हिडिओ व्हिव्हींग पथक अशा सर्व पथकास सजग राहून कडक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.

## श्रीगुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयालां (BJ) मध्ये राष्ट्रीय पत्रकार दिन साजरा



**विश्वदीप कांबळे हदगाव प्रतिनिधी विभाग नांदेड :** श्रीगुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयालां मध्ये मराठी पत्रकारितेचे दर्पणकार जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले आणि राष्ट्रीय पत्रकार दिन साजरा करण्यात आलं . यावेळी श्रीगुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास कदम सर, प्रा. अमोल धुळे , प्रा. विपिन कदम, प्रा. संजय नरवाडे, भारत सोनटक्के, तसेच शुभांगी वाघमारे, सेहनल बनसोडे, तेजस्विनी कोल्हे , निकिता लोणे , आशिष थोरात, सुमित भोळे, सचिन भिसे, अनिल डोखले, आदर्श दवणे आदित्य कुंटे, विकी नरवाडे, शिरीष वाढवे विद्यार्थ्यां उपस्थिती होते.

## कांजूर डम्पिंग ग्राऊंड बंद होणार - माजी महापौर दत्ता दळवी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** कांजूर येथील ग्राऊंड वर कचरावर प्रक्रिया होणार होती.परंतू त्याचा डम्पिंग ग्राऊंड म्हणून वापर होत आहे.याचा त्रास सर्वच नागरिकांना होत आहे.येथे कचरावेचक प्रक्रिया झाली नाही तर कांजूर डम्पिंग ग्राऊंड बंद होईल असे स्पष्टोक्ती मुंबईचे माजी महापौर दत्ता दळवी यांनी दिली. विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात शिवसेना भाजप व रिपब्लिकन सेना युतीच्या वॉड क्र.११८ च्या उमेदवार तेजस्वी उत्तम गाडे या ज्येष्ठ नागरिकांचे आशिर्वाद घेण्यासाठी आल्या होत्या.त्या प्रसंगी ते बोलत होते.यावेळी माजी



नगरसेवक उपेंद्र सावंत,प्रभात मित्र मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड,सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,उपाध्यक्ष निवृत्ती मस्के,माजी अध्यक्ष सुरेश सरनोबत, खजिनदार गौतम डांगळे आदि मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी सुरेश सरनोबत यांनी कन्नमवार नगरातील समस्यांचा पाढा वाचला. तेजस्वी गाडे या सॉफ्टवेअर इंजिनिअर असून सुशिक्षित व तरुण आहेत.त्या आपले प्रश्न मुंबई महानगरपालिकेत हिरारीने मांडतील असे सांगितले.माजी महापौर दत्ता दळवी यांनी कन्नमवार नगरातील म्हाडा वसाहत कालांतराने संपणार आहे.येथे टॉवर्स उभारली जात आहे.त्यामुळे जुनी ड्रेनेज लाईन, पाणी समस्या,गाड्यांचे पार्किंग आदी समस्या आहेत. म्हाडा संक्रमण शिबिरातील नागरिकांना त्यांच्या नावावर घरे करुन द्यावयाची आहेत. यासाठी मुंबई महानगरपालिकेत सत्ता असणे जरुरीचे आहे.केंद्रात नरेंद्र, राज्यात देवेंद्र व एकनाथ शिंदे यांचे सरकार आहे.त्यामुळे आपणास अडचण भासणार नाही.त्यामुळे तेजस्वी उत्तम गाडे यांना निवडून दिले तर कन्नमवार नगरात विकासाची गंगा वाहणार आहे.असे ते म्हणाले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन निवृत्ती मस्के यांनी केले तर आभार विवेक गायकवाड यांनी मांडले.

## जि. प. शाळा गुगुळपिंपरी येथे रस्ता सुरक्षा अभियान उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**हिंगोली प्रतिनिधी/प्रशांत टाकसाळ :** दिनांक ०६ जानेवारी २०२६ रोजी जि. प. प्राथमिक शाळा, गुगुळपिंपरी येथे रस्ता सुरक्षा व जीवन सुरक्षा अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमास उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हिंगोली मा. राहुलजी गावडे व श्री. अतुलजी बनापुरे प्रमुख उपस्थित होते.

या प्रसंगी इयत्ता ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली. सहभागी विद्यार्थ्यांना उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, हिंगोली यांच्या वतीने प्रोत्साहनपर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.



मा. राहुलजी गावडे व अतुलजी बनापुरे यांनी विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व, वाहतूक नियमांचे पालन व जीवन सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. तसेच शाळेचा परिसर, विद्यार्थ्यांची गुणवत्ता व सुंदर हस्ताक्षर पाहून त्यांनी विशेष कौतुक केले. गावकऱ्यांकडून शाळेस मिळणाऱ्या सहकार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

हस्ताक्षर तज्ञ श्री. पांडुरंग चोपडे यांनी सर्व ग्रामस्थांच्या वतीने रस्ता सुरक्षा नियम पाळण्याची ग्वाही दिली.कार्यक्रमास शाळेचे उच्चश्रेणी मुख्याध्यापक श्री. सुभाष पोहकर, सरपंच नारायण खोडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शामराव सुर्वे, उपाध्यक्ष प्रकाश इंगोले तसेच पांडुरंग चोपडे, प्रफुल्ल तायडे, कडुजी खोडे, कडुजी तायडे, कैलास बांगर, विष्णू तायडे व अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शिक्षकवृंद श्री. किशोर हनवते, उद्धव रनबावळे, भाऊराव शिंदे, भागवत डांगे, नारायण बोरकर, दत्ता लहाने, सुनील अडबलवार यांनी केले.

## सिल्लोडचा 'ग्रीन पॅटर्न'; माळरानावर फुलली १५०० झाडांची 'इंधन बँक'

### वृक्षसंवर्धक डॉ. संतोष पाटील यांचा अभिनव प्रयोग; ग्रामीण भागातील इंधनाचा प्रश्न सुटणार

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :** ग्रामीण भागात आजही स्वयंपाकासाठी इंधनाचा मुख्य स्रोत म्हणून लाकडाचा वापर केला जातो. मात्र, यामुळे मौल्यवान झाडांची कत्तल होऊन पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. ही गंभीर बाब ओळखून सिल्लोड येथील वृक्षसंवर्धक तथा अभिनव प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. संतोष पाटील यांनी एका अभिनव प्रयोगातून हट्टी आणि बहुली यांसारख्या शुष्क माळरानावर तब्बल १५०० झाडे जगवून भविष्यातील 'इंधन बँक' (Bio-mass Bank) तयार केली आहे.ग्रामीण भागातील ऊर्जेची गरज आणि पर्यावरणाचे रक्षण यांचा मेळ घालणारा हा 'सिल्लोड पॅटर्न' सध्या कौतुकाचा विषय ठरत आहे.



**नैसर्गिक वनांवरील ताण होणार कमी**

डॉ. पाटील यांनी २०२३ ते २०२५ या दोन वर्षांच्या कालावधीत हट्टी, बहुली, पांगरी शिवार, हळदा अशा पाच गावांलगतच्या गायरान जमिनी, ओढे आणि नाल्यांच्या काठी वृक्षारोपण केले. त्यांनी केवळ शोभेची झाडे न लावता ग्रामीण भागाची गरज ओळखून बाभूळ, हिवर, धामोडी, महारुख आणि महोगणी यांसारख्या झाडांच्या २००० हून अधिक रोपांची लागवड केली होती. त्यापैकी १५०० झाडे कडक उन्हाळा आणि पाणीटंचाईवर मात करून यशस्वीपणे जगवण्यात आली आहेत.

> " के वळ झाडे लावणे महत्त्वाचे नसून ती जगवणे काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील इंधनाचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि नैसर्गिक वने वाचवण्यासाठी आम्ही हा 'बा यो मास' प्रकल्प हाती घेतला आहे. यातून पर्यावरणासोबतच सर्वसामान्यांनाही लाभ होईल."
> — डॉ. संतोष पाटील (उपाध्यक्ष, अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड)

**२०० टन जळाऊ लाकूड उपलब्ध होणार**

या झाडांच्या वाढीमुळे भविष्यात अंदाजे २०० टन जळाऊ लाकूड (बायोमास) उपलब्ध होणार आहे. यामुळे गरिबांच्या घरची चूल पेटण्यास मदत होणार असून, सरपणासाठी होणारी अवैध वृक्षतोड थांबण्यास मदत होईल. निसर्गातील मौल्यवान वनसंपदा वाचवण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे.

हा कठीण प्रकल्प यशस्वी करण्यासाठी डॉ. संतोष पाटील यांना भाऊसाहेब निकोद, भिकन सोनोने, रवींद्र तुपे, संतोष कोळी, राहुल भोटकर आणि आकाश मोरे-कोळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## गणेश टेकडी मंदिरात मंगळवारी तिळी चतुर्थी

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू//संपादक नागपूर विभाग :** गणेश मंदिर टेकडी येथे मंगळवारी 6 जानेवारी रोजी, तिळी चतुर्थी चे आयोजन करण्यात आले आहे. असे श्रीराम कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेमध्ये माहिती दिली. त्या निमित्ताने मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई करण्यात आली असून पंकज अग्रवाल यांच्यावतीने सजावट करण्यात आली आहे. संस्थे च्यावतीने साडे सात किलो वजनांचे गर्भगृह तयार करण्यात आले. हे विशेष : याप्रसंगी भक्तांना 900 किलो गुळाच्या रेवडीचे प्रसाद वाटप करण्यात येईल. कुठलीही दुर्घटना घडू नये आणि भाविकांना



सहजपणे श्री चे दर्शन घेता यावे. यासाठी वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त तैण्यात करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे पाचशे स्वयंसेवकांची मदत घेण्यात आली आहे. ६ तारखेला सकाळी 4 वाजता अजय संचेती यांच्या शुभहस्ते महापूजा आरती करण्यात येईल. यासाठी विविध समित्या घटित करण्यात आल्याची श्रीराम कुलकर्णी यांनी पत्रकारांना सांगितले.

# खांदा कॉलनी प्रभाग 15 मधून शिवाजी दांगट यांची प्रचारात आघाडी

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र कांबळे/खांदा कॉलनी प्रतिनिधी :** खांदा कॉलनी प्रभाग 15 ड मधून शिवसेना उबाटा गटाचे उमेदवार शिवाजी दांगट यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतल्याची पहावयास मिळत आहे कार्यकत्यांच्या बळावर सहा महिन्यांपूर्वीच त्यांनी आपली उमेदवारी घोषित केली होती शिवसेना शाखा येथे सामाजिक कामातून त्यांनी आपली उमेद दाखवली सर्वांना सांभाळून



व सोबथ घेणारा नेता अशी त्यांची शाखेमध्ये प्रतिमा तयार झाली आहे त्यांच्या शांत व संयमी स्वभावामुळे ते जनते मध्ये लवकर मिसळत आहे त्यामुळे जनतेने आपल्याला पाच वर्षे सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन ते ठिकठिकाणी करताना दिसत आहेत त्यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर खांदा कॉलनीतल प्रत्येक शाखाप्रमुखानी त्यांच्या प्रचारासाठी झोकून दिले आहे त्यामुळे सध्यातरी महाविकास आघाडी उमेदवार शिवाजी दांगट यानी प्रचारात मोठी आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे

# तळा नगरपंचायत नवीन प्रशासकीय इमारतीचे माननीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नितीन लोखंडे/तळा :** नागरी सेवा व सुविधा योजनेअंतर्गत तालुक्यातील तळा नगरपंचायत नवीन प्रशासकीय इमारतीचे तसेच प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत मोदी तलावाचे सुशोभिकरणाचे भूमिपूजन माननीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.



रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्याचा भाग डोंगराळ तसेच दुर्गम भाग आहे. या भागात विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत. येणाऱ्या काळात विविध योजनांद्वारे विविध विकास प्रकल्प राबवण्यात येतील. याकरता आम्ही उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सदैव प्रयत्नशील राहणार आहोत. तळ्याचा मुख्य प्रश्न औद्योगिक विकासाचा आहे. या ठिकाणी उद्योगधंदे नसल्यामुळे येथील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात मुंबईसारख्या शहरांमध्ये स्थलांतर झालेले आहे. हे स्थलांतर रोखण्यासाठी केंद्रातू औद्योगीकरणासाठी निधी उपलब्ध करण्यात आला असून सुमारे आठ ते दहा हजार कोटीची गुंतवणूक या ठिकाणी येणार आहे. तळा तालुक्यामध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. याचबरोबर तालुक्यातील पर्यटन क्षेत्राचाही चांगल्या पद्धतीने विकास होत आहे. तालुक्यातील पर्यटकांची संख्या वाढवण्यासाठी ह्या संपूर्ण भागाची अधिक प्रगती व्हावी अशी मी श्री. चंडिका मातेच्या चरणी प्रार्थना करतो. ज्या वेळेस या ठिकाणी कारखाना उभा राहील त्यावेळेस सर्वाधिक जास्त भरती कुठली राहील तर ती माझ्या तळा तालुक्यातील असेल असा शब्द तळावासीयांना दिला. मी शाहू फुले आंबेडकर समतेचा विचाराचा कार्यकर्ता आहे. शिव शाहू फुले आंबेडकरी विचारांची खऱ्या अर्थाने कोण पाईक असेल तर ती माझ्या तळा तालुक्यातील जनता आहे. तळा तालुक्यामध्ये कुडे या गावी ऐतिहासिक बुद्धिस्ट लेणी आहे. घारापुरी लेणीला मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देण्यासाठी जात असतात. त्या प्रमाणे कुडे लेणीलासुध्दा भेट देण्यासाठी जगभरातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात. निर्वाचित होऊन लोकसभेमध्ये गेल्यानंतर कुडे लेणी करता मला निधी उपलब्ध करता आला. महाड येथील गंधारपाले लेणी तसेच कुडे लेणीला यापेक्षा अधिक विकसित करू शकलो तर तळा तालुक्यात पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढेल. आणि तालुक्यातील चित्र बदललेला आपल्याला पहावयास मिळेल. माननीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार म्हणाले तळ्याच्या वैभवात भर टाकणारी आठ कोटी रुपये खर्च करून तळा नगरपंचायतीची तीन मजली प्रशासकीय इमारत होत आहे. हि इमारत सुसज्ज आकर्षक कामाचा दर्जा राखून बनवण्यात येईल. ठेकेदाराने कुठल्याही पद्धतीचा हलगर्जीपणा न करता काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देखील दिल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती करता राज्यातील 36 जिल्ह्यामध्ये ट्रिपल आयटीचे जाळ उभे केले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगती करता ए आय सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणं आगामी काळात फायदेशीर होणार आहे. येथे येणाऱ्या प्रकल्पामधून येथील विद्यार्थी विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. या ठिकाणचे नागरीकांचे स्थलांतर थांबलं पाहिजे. या ठिकाणी प्रदूषण विरहित प्रकल्प आणण्याकरता तसेच स्थलांतर थांबवण्याकरता आम्ही सर्वजण प्रयत्न करत आहोत.

या कार्यक्रमाकरिता महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, मा. आमदार अनिकेत तटकरे, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल, विभागाचे अधिकारी कर्मचारी सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्ते विद्यार्थी नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# बाळशास्त्री जांभेकर पत्रकार दिनानिमित्त संविधान बचाव संघर्ष समितीच्या वतीने पत्रकार संजीव भांबोरे यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी भंडारा :** एचडी महाविद्यालयात जिल्हा बचाव संघर्ष समितीच्या वतीने प्रेस संपादक पत्रकार व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांचा बाळशास्त्री जांभेकर पत्रकार दिनानिमित्त शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भंडारा जिल्हा संघर्ष समितीचे अध्यक्ष रोशन जांभुळकर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे ,यांच्या हस्ते सत्कार करण्यात



आला. यावेळी डॉ. बाळकृष्ण सार्वे ,अमृत बनसोड ,संजय मते ,हिवराज उके, आसित बागडे, वामनराव गोंधुळे ,अजबराव चिचामे,डॉ.सुरेश खोब्रागडे, डॉ रवींद्र जनबंधू ,ज्ञानचंद जांभुळकर, दिलीप वानखेडे ,राजेश मडामे, प्रभाताई पेंदाम गोंडवाना गणतंत्र संघटना,मनीषा भांडारकर, व असंख्य कार्यकर्ते यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

# प्राणी मित्र वन्यजीव रक्षक मोहन मुर्खे विदर्भवीर पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**माहूर प्रतिनिधी/सय्यद इसा :** दिनांक 4 रोजी नागपूर येथे प्राणी मित्रासाठी एका भव्य दिव्य विदर्भवीर पुरस्कार 2026 कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते वन्यजीवांच्या संवर्धनासाठी रात्रंदिवस निस्वार्थपणे काम करणाऱ्या प्राणीमित्रचा विदर्भ वीर पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला सायफळ तालुका माहुरगड येथील प्राणिमित्र वन्यजीव रक्षक मोहन मुर्खे याची निवड करण्यात आली होती वन्यजीवांसाठी त्यांच्या निस्वार्थ कार्याची दखल घेत त्यांना विदर्भवीर पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं . प्राणी मित्र मोहन मुर्खे (निलेश) गेल्या कित्येक वर्षापासून वन्यजीवांसाठी काम करतात वन्यजीव पर्यावरण यांचं महत्त्व सांगताना गेल्या कित्येक दिवसापासून अनेक उपक्रम व वेगवेगळ्या मार्गातून जनजागृती चे काम त्यांनी केले आहे प्राणी व मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी



व त्यांचे संवर्धन करण्याच्या हेतूने शाळा व महाविद्यालय जंगलां सभोवताली राहणाऱ्या गावातील नागरिकांना प्राणी वा पर्यावरण याचे यांचे महत्त्व सांगून प्राणी व मानव यांच्यात होणारा संघर्ष कशा पद्धतीने टाळता येईल व प्राण्याचे संवर्धन करणे हेतूने एक मोलाची भूमिका पार पाडली आहे वन्यजीव सोबतच मोहन मुर्खे (निलेश )चांगले पक्षी मित्र पण आहेत. आपल्या आजूबाजूला राहणारा पक्षाचा त्यांना चांगला अभ्यास आहे वनविभागासोबत पक्षी परीक्षण पर्यावरण व वन्यजीव यांच्यासाठी अनेक उपक्रम राबवले त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांना 2022 रोजी द रियल हिरो या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते वाईल्ड लाईफ वेल्फेअर सोसायटी नागपूर यांनी पशुपक्षी पर्यावरण निसर्गासाठी अहोरात्र काम करणाऱ्या हेरोन चा सन्मान केल्याबद्दल निलेश मुर्खे यांनी त्यांचे आभार वेक्त करत शासनाने सुद्धा असे कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे जेणेकरून वडिलांच्या क्षेत्रात काम करणे हिरोंना त्याच्या निस्वार्थ कामाचा सन्मान मिळाला पाहिजे सर्पमित्र प्राणी मित्र याचबरोबर मोहन मुर्खे हेल्पिंग हँड्स वाइल्ड एडवेंचर अँड नेचर क्लब या संस्थेचे नांदेड जिल्हा अध्यक्ष आहेत .. कुठेही वन्यजीव जखमी आढळल्यास हेल्पलाइन नंबर 9922363538 निसर्ग रक्षनार्थ परम कर्तव्य.

## पत्रकारीतेमधील मुल्यांची जपणूक करीत पत्रकारीता समृद्ध व्हावी

# वाशिम जिल्हा माहिती कार्यालयातील पत्रकार दिन कार्यक्रमातील सूर पत्रकार दिन साजरा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** पत्रकारीतेमध्ये मूल्य जोपासले गेले पाहिजे. या मूल्यांच्या बळावरच समृद्ध पत्रकारीता करता येते. पत्रकार समाजाचा पाईक म्हणून कार्य करतो. समाजातील विविध समस्यांचा विषयनिहाय उलगडा करतो. पत्रकारांच्या लेखनीमधूनच अशा विविध सामाजिक समस्यांना वाचा फोडल्या जाते. या समस्यांकडे शासन, प्रशासनाचे लक्ष जावून तिथे शाश्वत विकास घडतो, असा सूर पत्रकार दिनानिमित्त



आयोजित कार्यक्रमात निघाला कै.बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी काढले होते. त्यानिमित्त हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने दि.६ जानेवारी रोजी जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अभिवादनानंतर पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी पत्रकार सर्वश्री नंदकिशोर नारे, नंदकिशोर वैद्य, सुनील गाडेकर, दत्ता महल्ले, शिखरचंद बागरेचा,अजय ढवळे,सुनील कांबळे, सुनील मिसर,संदीप पिंपळकर, विजय भांदुर्गे, विनोद तायडे, प्रताप नागरे, गजानन पवार पाटील यशवंत पेंढारकर, जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटुडे-राऊत यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयाचे राजू जाधव, रुपेश सवाई, प्रमोद राठोड व अनिल कुरकुटे यांच्यासह पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.

# वेळीच उपचार मिळाल्याने गिर गाय व वासराचे प्राण वाचले

**दैनिक युवक आधार**

**नांदेड/प्रतिनिधी/ प्रकाश गवारे :** तालुका नांदेडमधील जवाहर नगर येथे शेतकरी वैभव पाटील कदम यांच्या मालकीच्या गिर गायीची प्रसूतीदरम्यान अत्यंत गंभीर अवस्था निर्माण झाली होती. गायीचा पिळ पडून अडकल्याने तब्बल २४ तास ती वेदनेत होती. दीर्घकाळ अडकल्यामुळे गाय पूर्णतः निर्बल झाली होती, तर पोटातील वासराला श्वास घेण्यास तीव्र त्रास सुरू झाला होता. परिस्थिती चिंताजनक असल्याचे लक्षात येताच तातडीने पशुवैद्यकीय मदतीसाठी संपर्क करण्यात आला. नांदेड येथील डॉ. गायकवाड साहेब यांच्या माहितीनुसार डॉ. संदीप हाटकर यांनी संपूर्ण परिस्थितीची अचूक माहिती घेतली आणि विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. डॉ. हाटकर यांनी योग्य वैद्यकीय



उपचार करत पोटातील वासराला तोंडाव्दारे ऑक्सिजन देण्याची व्यवस्था केली. वेळेवर केलेल्या उपचारांमुळे अखेर गाय व वासरू या दोघांनाही जिवंत वाचविण्यात यश आले.या घटनेमुळे शेतकरी वैभव पाटील कदम यांनी पशुवैद्यकीय डॉक्टरांचे आभार मानले असून, ग्रामीण भागात वेळेवर मिळालेल्या वैद्यकीय सेवेबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. पशुधन वाचविण्यासाठी तात्काळ उपचार किती महत्त्वाचे ठरतात, याचे हे उदाहरण असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीला उजाळा :पत्रकार उत्कर्ष समितीकडून नवी मुंबईत लेखणीच्या योद्धयांचा यथोचित सन्मान

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून ६ जानेवारी २०२६ रोजी नवी मुंबईतील खारकोपर येथे" गौरव लेखणीचा सन्मान आपल्या कर्तृत्वाचा" हा भव्य सोहळा अत्यंत दिमाखात संपन्न झाला. पत्रकार उत्कर्ष समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात पत्रकारिता क्षेत्रात अहोरात्र झटणाऱ्या निधड्या छातीच्या पत्रकारांना सन्मानित करण्यात आले.

खारकोपर रेल्वे स्थानकाजवळील जोमा नारायण घरत समाज मंदिर सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.पत्रकार उत्कर्ष समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉक्टर अशोक लक्ष्मण म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळयाचे नेटके नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा श्री महेंद्रजी घरत यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाची सुरुवात महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी पत्रकारांना मार्गदर्शन करताना महेंद्रजी घरत त्यांनी पत्रकारितेचे समाजातील स्थान अधोरेखित केले पत्रकार लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ आहे संकटाच्या काळातही आपली लेखणी जिवंत ठेवून समाजाला न्याय देण्याचे काम पत्रकार करतात असे शब्दांत त्यांनी पत्रकारांचे कौतुक केले .त्यांचे शुभहस्ते पत्रकरिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारा पत्रकारांना सन्मानित करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.



यावेळी व्यासपीठावर समितीचे राज्यसचिव डॉ. वैभव पाटील ,खजिनदार शैलेश ठाकूर, सहसचिव ज्ञानेश्वर कोळी ,सदस्य रोहिदास जाधव ,दिलीप गायकर आदी मान्यवर उपस्थित होते. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील अन्यायाला वाचा फोडणाऱ्या आणि जनहित जपणाऱ्या पत्रकारांना यावेळी गौरविण्यात आले. समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या निष्ठेचा आणि परिश्रमाचाही यावेळी सन्मान करण्यात आला. पत्रकार उत्कर्ष समिती महिला समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांहि यावेळी उपस्थित होत्या त्यांचाही सन्मान करण्यात आला .

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानताना एक वेगळीच ऊर्जा पाहायला मिळाली .पत्रकार हे समाजाचा कणा आहे, आणि त्याच्या सन्मानाने लोकशाहीचे मूल्य अधिक घट्ट होतात अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. रामशेठ ठाकूर स्टेडियम परिसरातील या सोहळ्याने केवळ पत्रकारांचा गौरवच नाही तर बदलत्या काळातही लेखणीची ताकद शाबूत असल्याचा संदेश संपूर्ण नवी मुंबई व रायगडला दिला गेला अत्यंत शिस्त , प्रेरणादायी वातावरणात पार पडलेला सोहळा उपस्थित पत्रकारांसाठी एक अविस्मरणीय ठेवा ठरला.

लेखणीचा सन्मान हाच आमचा स्वाभिमान हा संदेश देत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या विचारांची मशाल तेवत ठेवत प्रेरणादायी कार्यक्रमाची सांगता झाली .एक सुंदर आणि शिस्तबद्ध आयोजन म्हणून या कार्यक्रमाची चर्चा संपूर्ण परिसरात रंगली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोफेसर अक्षय पाटील यांनी आपल्या रंजक शब्दांत आणि खड्या आवाजात केली कार्यक्रमला उंचीवर नेले.

# शिक्षक संघ सोयगाव तालुकाध्यक्षपदी कृष्णा पाटील, सरचिटणीसपदी दीपक बावस्कर

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** दि.०३ जानेवारी २०२५ रोजी श्री अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या आवारात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ सोयगाव तालुका शाखेची सहविचार सभा जिल्हाध्यक्ष राजेश हिवाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा नेते संजय बागूल उपस्थित



होते.सभेच्या सुरुवातीला नुकतेच निधन झालेले शिक्षक कै.अनिल भिमसिंग पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.त्यानंतर थोर महापुरुष व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आदर्श शिक्षिका श्रीमती मंगलाताई बोरसे व श्रीमती सविता पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यानंतर तालुका शिक्षक संघाची नवीन कार्यकारिणी सर्वानुमते बिनविरोध निवडण्यात आली. यामध्ये तालुकाध्यक्षपदी कृष्णा पाटील,सरचिटणीसपदी दीपक बावस्कर,मुख्य तालुका संपर्कप्रमुखपदी परमानंद अशोकलाल जयस्वाल, कार्याध्यक्षपदी रामेश्वर सावळे, कोषाध्यक्षपदी अतुल पाटील, प्रसिद्धीप्रमुखपदी गजानन ताडे,उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर मख व अनमोल शिंदे तसेच संघटकपदी योगेश फुसे यांची निवड झाली.याप्रसंगी जिल्हाध्यक्ष राजेश हिवाळे यांनी मावळते तालुकाध्यक्ष दुर्गादास बलांडे यांच्या कार्याचे कौतुक करून नवनिर्वाचित कार्यकारिणीस शुभेच्छा दिल्या. सहविचार सभेस तालुक्यातील शिक्षक पदाधिकारी व शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पनवेल मनपा निवडणूक २०२६: प्रभाग १७ मध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांचा जोरदार प्रचार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर नवीन पनवेल प्रभाग क्रमांक १७ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांनी प्रचाराचा धडाका लावला आहे.ॲड. प्रकाश बिनेदार (अ), डॉ. अस्मिता घरत (ब), ॲड. शिवानी घरत (क) आणि ॲड. मनोज भुजबळ (ड) हे उमेदवार मतदारांशी थेट संवाद साधत घरोघरी जाऊन प्रचार करत आहेत.



प्रभागात आतापर्यंत झालेल्या विविध विकासकामांची माहिती देत कार्यकर्ते आणि उमेदवार मतदारांशी संवाद साधत असून, नागरिकांकडून या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचारादरम्यान घोषणाबाजी, नागरिकांचा सहभाग आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहायला मिळत असून संपूर्ण प्रभाग क्रमांक १७ भाजपमहायुतीमय वातावरणात दुमदुमून गेला आहे.

विशेष म्हणजे, प्रभाग १७ मधील उमेदवारांपैकी डॉ. अस्मिता घरत या वैद्यकीय क्षेत्रातील असून, तर प्रकाश बिनेदार, शिवानी घरत आणि मनोज भुजबळ हे तिघेही विधी तज्ज्ञ आहेत.

त्यामुळे भाजपने या निवडणुकीत उच्च शिक्षित आणि अनुभव असलेले उमेदवार मतदारांसमोर दिले असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

याच कारणामुळे सुज्ञ मतदारांकडून या उमेदवारांचे स्वागत होत असून, विकासाभिमुख नेतृत्वाला पाठिंबा देण्याची भावना प्रभागात दिसून येत आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून विद्यार्थ्यांना समाजभानाची जाणीव करून दिली जाते - सुरेश घोळवे

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून विद्यार्थ्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास घडविला जातो. अशा शिबिरातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडते आणि विद्यार्थ्यांना सामाजिक भान करून दिले जाते असे प्रतिपादन तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शिबिर दिनांक ६ ते १२ जानेवारी या काळात मौजे बावी येथे होत असून त्या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्याप्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दर्पण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे हे होते तर प्रमुख पाहुणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक हरी जमाले हे होते. व्यासपीठावर सरपंच सौ. मीराताई नवनाथ ढाकणे, उपसरपंच भागवत ढाकणे, शरद दिनकर ढाकणे,



अशोक ढाकणे, अश्रुबा मामा खरमाटे, सिद्धार्थ खेमाडे, बाळासाहेब ढाकणे इत्यादी प्रतिष्ठित नागरिक व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे, डॉ. प्रीती विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना तहसीलदार सुरेश घोळवे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये समाजभान, नेतृत्वगुण व स्वयंसेवेची भावना निर्माण होत असल्याचे नमूद केले. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्ही यांनी केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. हरी जमाले म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, शिस्त आणि स्वयंसेवेची भावना निर्माण करणारी प्रभावी चळवळ असल्याचे सांगितले. ग्रामीण विकासासाठी तरुणांनी पुढाकार घेऊन समाजातील समस्या ओळखून त्यावर कृती करावी, असे त्यांनी नमूद केले. शिबिरातील उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो तसेच समाजाशी त्यांचे नाते अधिक दृढ होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी योजना आहे या योजनेचा विद्यार्थ्यांनी सर्वांगिण विकास करण्यासाठी उपयोग करून घ्यावा राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना मिळालेली अनमोल देणगी आहे तिचा वापर आपल्या जीवनात केल्यास यशस्वी माणूस घडण्यास उपयोग होतो. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिरातून केलेले काम ग्रामीण भागातील लोकांना दिशादर्शक असते हे विद्यार्थी जे कष्ट करतात ते कष्ट अल्प जरी असले तरी त्याची व्याप्ती जीवनाला प्रेरणा देणारी आहे ग्रामस्थांनी या विद्यार्थ्यांबरोबर श्रमदान केले तर गावचा विकास व्हायला वेळ लागणार नाही असेही ते म्हणाले

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक घोळवे यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ.रमेश लाहोटी यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रीती विधाते यांनी मानले .

या कार्यक्रमाला स्वंयसेवक विद्यार्थी, विद्यार्थिनी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरकारी दालनात धनदांडग्यांना लाल गालिचा, सामान्य नागरिकांना मात्र दारातच थांबा!"

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** सरकारी कार्यालये ही सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी असतात; मात्र प्रत्यक्षात चित्र वेगळेच दिसून येत आहे. तहसील कार्यालयात धनदांडगे, राजकीय ओळखीचे किंवा प्रभावशाली व्यक्तींना प्राधान्य दिले जात असून सामान्य नागरिकांना मात्र अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी तासन्तास वाट पाहावी लागत असल्याचे गंभीर वास्तव समोर येत आहे.

गोरगरीब नागरिक आपल्या कामासाठी दूरवरच्या खेड्यापाड्यांतून तहसील कार्यालयात येतात. कागदपत्रांची पूर्तता, प्रमाणपत्रे, शासकीय योजना, महसूलविषयक कामे यासाठी त्यांनी वेळ, पैसा आणि मेहनत खर्च केलेली असते. मात्र एखाद्या अडचणीमुळे किंवा



तांत्रिक कारणांमुळे काम उशिरा झाले तर तहसीलदारांना भेटण्याचा प्रयत्न केला असता "सध्या कामात आहेत", "मीटिंगमध्ये आहेत", अशी उत्तरे देऊन नागरिकांना परत पाठवले जाते.

दुसरीकडे, धनदांडगे किंवा ओळखीचे लोक मात्र अगदी सहजपणे अधिकाऱ्यांच्या दालनात प्रवेश करताना दिसतात. त्यांच्या भेटी केवळ कामापुरत्या मर्यादित नसून गप्पा, चर्चा यासाठीही अधिकाऱ्यांकडे वेळच वेळ असल्याचे चित्र नागरिकांच्या डोळ्यांसमोर उभे राहत आहे. ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

सरकारी कार्यालयात अशी दुजाभावाची वागणूक देणे हे लोकशाही मूल्यांना हरताळ फासणारे असून अत्यंत निंदनीय आहे. सर्व नागरिक कायद्याने समान असताना, कार्यालयीन व्यवहारात हा भेदभाव का? असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत.

हे प्रकार वारंवार घडत राहिल्यास श्रीवर्धन मध्ये प्रशासनाविरोधात आंदोलन छेडण्याशिवाय गत्यंतर राहणार नाही, अशी चर्चा सामान्य माणसांमध्ये सुरू झाल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाने वेळीच याची दखल घेऊन सर्व नागरिकांना समान न्याय आणि वेळ देण्याची भूमिका घेतली नाही, तर असंतोषाचे रूपांतर आंदोलनात होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

# वरिष्ठांच्या आदेशाला उदगीर पुरवठा अधिकारी दाखवतात केराची टोपली !

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी (बालाजी तेलंगे) :** उदगीर शहरातील उदयगिरी गॅस एजन्सी व मनोज गॅस एजन्सी या दोन गॅस वितरकांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे.

संघटनेचा आरोप आहे की, उदगीर शहरातील छोटे-मोठे हॉटेल व्यावसायिक, भेळ-पाणीपुरी विक्रेते यांना घरगुती वापराचा गॅस सिलिंडर शासनाच्या नियमांना डावलून जादा दराने विक्री करण्यात येत आहे. हा प्रकार पूर्णपणे बेकायदेशीर असून, संबंधित गॅस एजन्सी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गॅस धारकांशी संगनमत करून हा गैरव्यवहार करत




असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याबाबत अखिल भारतीय छावा संघटनेने यापूर्वीही अनेक वेळा उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडे लेखी तक्रारी सादर केल्या होत्या. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्रव्यवहाराकडे दुर्लक्ष करून कारवाई होत नसल्याने अर्जदारांची पिळवणूक होत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. तसेच, या प्रकरणात काही स्थानिक अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असल्याने त्यांचीही चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दिनांक 5 जानेवारी 2026 पासून या दोन्ही गॅस एजन्सींसह संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, यासाठी तालुका संघटक बालाजी भोसले यांच्या नेतृत्वाखाली हे आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनात प्रतीक कांबळे, बालाजी सूर्यवंशी, प्रेम पवार, राहुल बिरादार यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित आहेत.प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.



**पाटोदा - पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. सोमिनाथजी कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली ६ जानेवारी दर्पण दिना निमित्त दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी पाटोदा तालुका पत्रकार संघाचे सचिव ॲड.महेश बेदरे व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या अध्यक्षपदी राजेंद्र पाटील यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** तालुका पत्रकार विकास मंचाच्या अध्यक्ष पदी राजेंद्र पाटील यांची निवड करण्यात आली. दिनांक ६ जानेवारी रोजी संपन्न झालेल्या पत्रकार दिन सोहळ्यामध्ये नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. मावळते अध्यक्ष मंदार दोंदे यांनी नूतन कार्यकारिणी जाहीर करून त्यांना आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मंचच्या सदस्यांनी पत्रकारितेत फोफावत असलेल्या अपप्रवृत्तींना जागीच ठेचण्याची शपथ घेतली. दर्पण या पहिल्या वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी रोजी पहिला अंक प्रसिद्ध केला म्हणून दरवर्षी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार माधव पाटील यांनी आचार्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना



अभिवादन केले.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या नूतन कार्यकारिणीचे अध्यक्ष राजेंद्र पाटील तर उपाध्यक्ष दीपक घोसाळकर असणार आहेत. सचिव पदी हरेश साठे यांची पुनर्निवड करण्यात आलेली असून सहसचिव म्हणून राजू गाडे जबाबदारी सांभाळतील तर खजिनदार या अत्यंत महत्त्वपूर्ण पदावरती दत्ता कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमाला सल्लागार माधव पाटील, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार मंदार दोंदे, संजय कदम, सुनील राठोड यांच्यासह नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष दीपक घोसाळकर, खजिनदार दत्ता कुलकर्णी, सहसचिव राजू गाडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# सत्याचा शोध आणि निर्भीड लेखणी: पत्रकार दिनाचे औचित्य

६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवून बाळशास्त्री जांभेकर यांनी महाराष्ट्रात पत्रकारितेचा पाया रचला. आज त्याच महान परंपरेचे स्मरण करण्याचा आणि आपल्या लेखणीशी प्रामाणिक राहण्याचा दिवस म्हणजे 'पत्रकार दिन'. मी, सचिन बन्सोड, एक पत्रकार म्हणून जेव्हा या क्षेत्राकडे पाहतो, तेव्हा जाणवते की पत्रकारिता ही केवळ नोकरी नसून समाजाप्रती असलेली एक मोठी जबाबदारी आहे.

**माझी लेखणी, माझा शब्द: सचिन बन्सोड यांचे विचार**

पत्रकारितेच्या प्रवासात अनेक चढ-उतार येतात, पण सचिन बन्सोड म्हणून माझी भूमिका नेहमीच स्पष्ट राहिली आहे – "सत्य कितीही कडू असले तरी ते समाजासमोर आलेच पाहिजे." समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणे हेच एका खऱ्या पत्रकाराचे कर्तव्य आहे.

**लोकशाहीचा आधारस्तंभ :** लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम पत्रकार करत असतात. जेव्हा एखादा अधिकारी किंवा नेता आपले कर्तव्य विसरतो, तेव्हा त्याला आरसा दाखवण्याचे काम आमची लेखणी करते. सचिन बन्सोड या नात्याने मला वाटते की, पत्रकाराचा 'प्रभा' (प्रभाव) हा नेहमी सकारात्मक बदलासाठीच असायला हवा.

**आजची आव्हाने आणि आमची भूमिका**

आज माहितीचा महापूर आला आहे, पण त्यात 'सत्य' शोधणे कठीण झाले आहे. अशा काळात सचिन बन्सोड आणि माझ्यासारखे अनेक पत्रकार अहोरात्र कष्ट करून बातमीची शहानिशा करत असतात.

जनतेचा विश्वास संपादन करणे.तळागाळातील लोकांचे प्रश्न मांडणे.

सत्तेला प्रश्न विचारण्याचे धाडस ठेवणे.या त्रिसूत्रीवरच माझी पत्रकारिता उभी आहे.

**संकल्प आजच्या दिनाचा**

पत्रकार दिनानिमित्त मी, सचिन बन्सोड, असा संकल्प करतो की, माझी लेखणी कधीही वैयक्तिक स्वार्थासाठी झुकणार नाही. समाजाचे हित हेच सर्वतोपरी मानून 'दर्पण'चा वारसा आम्ही निरंतर पुढे चालवू.अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या आणि सत्याची कास धरणाऱ्या माझ्या सर्व पत्रकार सहकाऱ्यांना पत्रकार दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!



सचिन बन्सोड (पत्रकार)
दैनिक युवक आधार

# रेवदंडा रक्तदान महाकुंभात २२५ जीवनदान

## जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्य यांच्या भक्त-सेवकांची भावपूर्ण सेवा

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/ अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** जगद्गुरू श्रीमत रामानंदाचार्य नरेंद्रचार्य यांच्या दिव्य प्रेरणेने रामानंद संप्रदाय चौल सेवाकेंद्राने रविवार दि. ४ जानेवारी २०२६ रोजी रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात 'जीवनदान महाकुंभ' अंतर्गत एक भावपूर्ण रक्तदान शिबिर घेतले. या शिबिराला विद्यश्री चॅरिटेबल ट्रस्ट नवी मुंबई ब्लड सेंटर खारघर आणि विक्रम खोपकर तसेच डॉ. भाग्यश्री विभाष पाटिल यांचे अथक सहकार्य लाभले. तब्बल २२५ रक्तदात्यांनी आपले थेंब थेंब रक्त दान करून अनेकांच्या जीवनरक्षेसाठी हृदयाचा टुकडा अर्पण केला. हे केवळ शिबिर नव्हते, तर माणुसकीच्या प्रेमाची, एकतेची आणि निस्वार्थ सेवेची जीवंत ज्योत होती!शिबिराचे उद्घाटन रेवदंडा ग्रुप ग्रामपंचायत सरपंच श्री. प्रफुल्ल मोरे यांच्या शुभहस्ते फीत कापून झाले. संप्रदायचे जिल्हा अध्यक्ष श्री. दिनेश पाटिल यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन रक्तदात्यांना आशीर्वाद दिले. सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत नियोजित हे शिबिर दात्यांच्या अतुलनीय उत्साहामुळे रात्री ९ पर्यंत चालले. विविध वयोगटातील भक्त, सेवक, तरुण, महिला आणि स्थानिक नागरिकांनी रांगा लावून सहभाग घेतला. प्रत्येक दात्याच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसत होते – कारण ते केवळ रक्त नव्हते, तर जीवनाचे अनमोल दान करत होते.भक्त-सेवकांची निस्वार्थ ओढ : आध्यात्मिक प्रेरणेचा जादूजगद्गुरू श्रीमत रामानंदाचार्य नरेंद्रचार्य यांचे हे भक्त आणि सेवक केवळ पूजाअर्चेनेच समाधान मानत नाहीत, तर त्यांच्या हृदयात सामाजिक सेवेची ज्योत नेहमी तेवत असते. या शिबिरातून त्यांना विविध उपक्रम राबवायची प्रेरणा मिळते, जी समाजाला आध्यात्मिक आणि सामाजिक कार्याकडे ओढते. माणूस माणसामध्ये प्रेम वाढते, चांगले संबंध दृढ होतात आणि स्वतःहून मदत करण्याची ओढ निर्माण होते –



कुठल्याही फळाची अपेक्षा न करता! 'एक थेंब रक्ताने लाखो हास्ये फुलवता येतील' ही रामानंदाचार्यांची शिकवण प्रत्यक्षात आणत हे सेवक माणुसकीचा धागा विणत आहेत. अशा कार्यामुळे परिसरातील प्रत्येकाच्या मनात सेवा-भावना जागृत होते आणि समाज एक परिवार बनतो.या यशस्वी शिबिरामागे पीआरओ पुजा कंटक यांचे अथक प्रयत्न हे मुख्य कारण. त्यांच्या सोबत सेवाकेंद्र अध्यक्ष श्री. विनायक काटकर, नितेश राऊत, श्रद्धा घरत, धनश्री घरत, सायली घरत, भक्ती घरत, स्वप्निल घरत, दर्शन परांजपे, समीर राऊत, शोभा राऊत, सुजाता भोस्तेकर, प्रज्ञा पाटिल, सायली पाटिल, सचिन पाटिल, किशोर सुरेकर, संतोष म्हात्रे, अश्रीता म्हात्रे, प्रिया राऊत, कृतिका घरत, सिद्धी भगत, प्रचिती काटकर, अथर्व काटकर, राज धुमाळ, विधी पाटिल, संदीप ठाकुर, वासुदेव मढवी, आशा कमळनाखवा, दमयंती जोयशी, अलका उंदीर, अक्षय कदम यांनी रात्रंदिवस मेहनत घेतली. त्यांच्या या निस्वार्थ सेवेमुळे शिबिराने हृदय जिंकले. शिबिराच्या समारोपावेळी पीआरओ पुजा कंटक यांनी सर्वांचे डोळ्यात पाणी येईल अशी भावपूर्ण भाष्य केली आणि रक्तदात्यांचे, सहकाऱ्यांचे आभार मानले. हे शिबिर केवळ आकड्यांचे यश नव्हते, तर भावनांचे विजय आहे. रामानंद संप्रदायाच्या या कार्याने रेवदंडा आणि परिसरातील नागरिकांना प्रेरणा मिळाली असून, अशा उपक्रमांची मागणी वाढली आहे. चला, आपणही पुढाकार घेऊया – कारण निस्वार्थ सेवा हाच खरा धर्म!

# सावखेड तेजन येथे अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीमय सांगता

## संगीतमय श्रीराम कथा सप्ताहाची दहीहंडी उत्सवाने सांगता

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर :** प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित संगीतमय श्रीराम कथा सप्ताहाचा समारोप अत्यंत भक्तिभावपूर्ण व उत्साहात पार पडला. शेवटच्या दिवशी ह.भ.प. चंद्रशेखर डोमडे महाराज यांच्या गोपाल काल्याच्या कीर्तनाने उपस्थित भक्तगण मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या सुमधुर वाणीतून साकारलेल्या कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.यानंतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. कुमारी अबोली जरीत हिचा सत्कार पं. मोहितरामजी पाठक महाराज (मध्यप्रदेश) यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, मानचिन्ह व भेटवस्तू देऊन करण्यात आला. यावेळी अबोलीने “राम आयेंगे मेरे झोपडी में” हे भक्तिगीत आपल्या मधुर आवाजात सादर करत भक्तगणांना भावविभोर केले.तसेच १०० मीटर फ्री-स्टाईल पोहण्यात सुवर्णपदक मिळविल्याबद्दल अर्णव मोहोड याचा नितीन चौधरी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. एम.एस्सी. (पर्यावरण) मध्ये प्रथम क्रमांक (फर्स्ट मेरिट) मिळविल्याबद्दल केतकी मोहोड



हिला विनोदजी राऊत यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमानंतर पं. मोतीरामजी पाठक महाराज व सुधांशु मोहोड यांच्या हस्ते दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय व जल्लोषपूर्ण झाले. या यशस्वी कार्यक्रमासाठी ट्रस्टचे अध्यक्ष श्री भाईजी मोहोड, कार्याध्यक्ष सुदामजी शिंगणे, सचिव प्रदीप अहिरे, उपाध्यक्ष दिवाकर मोहोड, कोषाध्यक्ष सुनिता मोहोड, तसेच अशोक यावले, डॉ. वराडे, श्रीमती बोरकर मॅडम, सौ. राठी मॅडम, डॉ. वाकुडकर, रमेश शनिवारे, अजिंक्य मोहोड, बोरकर सर आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

### ५८ व्या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याने परिसर झाला विठ्ठलमय नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध

**दैनिक युवक आधार**

**सिंदखेडराजा / प्रतिनिधी :** सिंदखेडराजा तालुक्यातील सावखेड तेजन येथे प.पु. सद्गुरू वैकुंठवासी ह.भ.प. श्री संत भगवानबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची (५८ वे वर्ष) मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात सांगता झाली.

वै. ह.भ.प. महंत भीमसिंह बाबा



यांच्या कृपाप्रसादाने व महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली या पवित्र सोहळ्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

**सप्ताहभर धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल**

सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण व गाथा भजन, दुपारी शिवमहापुराण, तर सायंकाळी हरिपाठ असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.रात्रीच्या सत्रात नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तन व जागराने संपूर्ण गावाचे वातावरण विठ्ठलमय झाले होते.

**नामवंत कीर्तनकारांनी दिली सेवा**

या सोहळ्यात ह.भ.प. विठ्ठल महाराज आसोलेकर (छत्रपती संभाजीनगर) यांनी शिवकथा प्रवक्ते म्हणून सेवा दिली.

तसेच सप्ताहात पुढील कीर्तनकारांच्या कीर्तनाचा लाभ भाविकांनी घेतला —

ह.भ.प. सतीश महाराज डोईफोडे
ह.भ.प. नाना महाराज कदम
ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे
ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाभळे
ह.भ.प. समाधान महाराज शर्मा
ह.भ.प. रामराव महाराज ढोक
ह.भ.प. सोपान महाराज शास्त्री

काल्याचे कीर्तन व भव्य महाप्रसाद

सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी ह.भ.प. डॉ. गणेश महाराज बडे (श्री क्षेत्र दुर्गाशक्ती गड) यांचे भावपूर्ण काल्याचे कीर्तन पार पडले.

यानंतर दुपारी ४ ते ६ या वेळेत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ परिसरातील शेकडो भाविकांनी घेतला.

श्री गणेश दत्तुजी काळुशे यांनी महाप्रसादासाठी अन्नदानाचे आयोजन केले होते.

**गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे सोहळा यशस्वी**

हा पवित्र सोहळा यशस्वी करण्यासाठी समस्त गावकरी, संत भगवानबाबा स्वयंसेवक मंडळ, सावखेड तेजन भजनी मंडळ, तसेच परिसरातील टाळकरी व गायनाचार्यांनी विशेष परिश्रम घेतले.५८ व्या वर्षातील या अखंड हरिनाम सप्ताहाने सावखेड तेजन परिसरात भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडवले.

---

## दर्पण दिनानिमित्त आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे :** पत्रकारितेचे जनक' दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीदिनी (६ जानेवारी) 'दर्पण दिन' साजरा करण्याच्या परंपरेअंतर्गत आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने यावर्षी एक सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. गणपती लिमटाका मंदिर, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५४ जणांनी रक्तदान करून समाजासाठी उदात्त बांधिलकीचे दर्शन घडवले. हा उपक्रम राबवून संघाने दर्पण दिन उत्साहात साजरा केला.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघ नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवत असून, ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त 'कर्तृत्वान महिलांचा झुंजार नारी पुरस्कार' देऊन समाजातील प्रेरणादायी महिलांचा सन्मान करतो. त्याचप्रमाणे, दर्पण दिनानिमित्त गेल्या तीन वर्षांपासून समाजासाठी व पत्रकारितेसाठी उल्लेखनीय



कार्य करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान केला जातो. या वर्षी, सामाजिक जागृतीला अधिक चालना देण्याच्या हेतूने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, निसार शेख, किशोर निकाळजे,अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, समीर शेख, सोपान पगारे, प्रेम पवळ, अतुल जवणे, मारूती सत्रे, आदिनाथ ठोंबरे, ओंकार कदम, संस्कार लाड यांनी संघटनात्मक काम पार पाडले. साईसेवा ब्लड सेंटरचे संचालक अजित जगताप, डॉ. बांगर, परिचारिका पायल वैद्य, जमुना उगले, प्रतिक्षा मदनकर, रागिनी टेभुरकर,पियुष खेबडे,निकिता मोरे,मनिषा सामृतवार,यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.संपूर्ण कार्यक्रम सुव्यवस्थित पार पडल्याने दर्पण दिन सामाजिक कार्याद्वारे साजरा करण्याचा संघाचा हेतू सफल ठरला.

---

## जिजामाता कॉन्व्हेंट मध्ये स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचा " आनंद मेळावा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** अनसिंग येथेनवीन वर्षाचे औचित्य साधून गुरूवार एक जानेवारी रोजी येथील जिजामाता कॉन्व्हेंट मध्ये खरी कमाई अंतर्गत स्काऊट गाईड विद्यार्थ्यां तर्फे आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हा आनंद मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे उदघाटन संस्थेचे सचिव ओम ठाकरे यांचे करण्यात आले. या प्रसंगी जिजामाता विद्यामंदिर चे पर्यवेक्षक माधव बोंद्रे, स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वैजेनाथ ढगे, एम सी व्ही सी चे प्रा.विठ्ठल गोरे व कॉन्व्हेंट चे प्राचार्य संजय चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित .या मेळाव्यात स्काऊट गाईड च्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून विक्री केली.या उपक्रमामधून सर्व सहभागी



विद्यार्थ्यांना खर्च वजा जाता भरपूर नफा प्राप्त झाला. या माध्यमातून स्काऊट गाईड यांना आपल्या जीवनात स्वावलंबी कसे बनावे हे शिकायला मिळाले.या आनंद मेळाव्यात शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व त्यांचे पालक यांनी सहभागी होऊन विविध खाद्यपदार्थाचा मनसोक्त आनंद घेतला.हा मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी कॉन्व्हेंटचे प्राचार्य संजय चव्हाण,स्काऊट शिक्षक श्रीकांत कव्हर, गाईड शिक्षिका मंजुषा सुर्वे, सेवक अनिल घोलप, संतोष सावंत व सर्व महिला सेविका यांनी अथक परिश्रम घेतले.

---

## श्री क्षेत्र वांगण सुळे येथून भगवान पांडुरंगाच्या पालखीचे श्री क्षेत्र त्रंबकेश्वराकडे प्रस्थान

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** सकळही तीर्थे निवृत्तीच्या पायी!

तेथे बुडी देई माझ्या मना!!

श्री क्षेत्र विठ्ठल रुक्मिणी मंदिर वांगण सुळे ता.सुरगाणा येथून भगवान पांडुरंगाच्या पालखीचे षट्तिला एकादशी निमित्ताने श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वराच्या दिशेने प्रस्थान.

प्रात:स्मरणीय वै. ह.भ.प.गुरुवर्य काशिराम बाबा मांगदेकर , ह.भ.प. मिसाळ बाबा कळमणेकर यांच्या कृपाशीर्वादाने व गावकरी मंडळी वांगण सुळे तसेच परिसरातील वारकरी भक्तांच्या सहकार्याने गेली २६ वर्षांपासून हा पायीं दिंडी सोहळा अविरतपणे चालू





आहे.पायीं दिंडी सोहळ्याचे हे यंदाचे २७ वे वर्षे असून महाराष्ट्र व गुजरात परीसरातील वारकरी मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले आहेत.

हाती भगव्या पताका, टाळ मृदुंगाचा गजर, डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला वारकरी भक्त , मुखी विठ्ठलाचे नाम, मध्यभागी भगवान पांडुरंगाची पालखी अशा या भक्तिमय वातावरणात त्र्यंबकराज्याच्या आणि श्री संत निवृत्तीनाथ महाराजांच्या भेटीसाठी लागलेली आस व विठ्ठल नामाचा गजर करत सर्व वारकरी अत्यंत शिस्तबद्ध रीतीने भजन, कीर्तन करीत दिंडी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वराच्या दिशेने मार्गस्थ झाली आहे.

या पायीं दिंडी सोहळ्याचे नेतृत्व ह. भ.प.नारायण बाबा चौधरी, ह.भ.प.परशराम बाबा चौधरी , ह.भ.प. मुरलीधर बाबा जाधव, ह.भ.प. गोविंद बाबा धुम, ह.भ.प.नारायण बाबा टोपले व सर्व गावकरी मंडळी वांगण सुळे हे करीत आहेत.

---

## पनवेलच्या वाघांची 'सुवर्ण गर्जना' तायक्वांडो मध्ये पंजाबच्या राष्ट्रीय मैदानात मारली धडक : रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** रत्नागिरीचे चिपळूण येथील डॉ .तात्यासाहेब नातू महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या मुंबई विद्यापीठ तायक्वांडो अजिंक्यपद स्पर्धा२०२५-२६ मध्ये तायक्वांडो असोसिएशन ऑफ पनवेल शहराच्या खेळाडूंनी प्रतिस्पर्ध्यांना आस्मान दाखवत चपळाईने आणि जिद्दीने ३ सुवर्ण आणि दोन कांस्यपदकावर पदकावर नाव कोरत पनवेलच्या २ शिलेदारांनी जालंदर ( पंजाब) येथे होणाऱ्या राष्ट्रीय अखिल भारतीय अंतरविद्यापीठ स्पर्धेचे तिकीट निश्चित केले आहे.

**मैदानावरील थरार आणि पथकांची लयलूट :**

सुवर्ण भरारी : ६३ किलो खालील वजनी गटात एच ओ सी कॉलेज रसायनीचा श्रीजय भगत आणि ८० किलो खालील वजनी गटात गुरुनानक खालसा कॉलेजचा निहाल भोईर यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली. या दोघांचीही आता पंजाब मधील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कांस्यपदकाची चमक: 63 किलो खालील गटात खालसा कॉलेजचा मोईनुद्दीन खान आणि ८० किलो खालील गटात पिल्लेई कॉलेजचा गुरुप्रसाद यांनी कांस्यपदकाची कमाई




करत पनवेल चे नाव उंचावले.

**यशाचे शिल्पकार आणि शुभेच्छा;**

या ऐतिहासिक कामगिरीबद्दल तायक्वांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबसे, अमजद खान ( गफार) डॉक्टर प्रसाद कुलकर्णी (खजिनदार), आणि पनवेल शहर तायक्वांडो असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड प्रज्ञा संदीप भगत, सचिव संजय भोईर खजिनदार हेमंत कोळी, सहसचिव संदीप भगत तसेच वीर तायक्वांडो असोसिएशन ऑफ पनवेल चे अध्यक्ष हरेश्वर भगत, सदस्य निखिल भोईर, यांनी खेळाडूंचे कौतुक केले.

कठोर सराव ,अंगात संचारलेली जिद्द आणि प्रशिक्षकांचे अचूक मार्गदर्शन यांच्या बळावर पनवेलच्या या तरुणांनी आज मुंबई विद्यापीठावर आपली मोहर उमटवली आहे. हे यश केवळ पदका पुरते मर्यादित नसून पनवेलच्या मातीतील खेळाडू आता राष्ट्रीय क्षितिजावर चमकण्यासाठी सज्ज झाले आहेत .पंजाबच्या मातीत जेव्हा हे खेळाडू उतरतील तेव्हा त्यांच्या प्रत्येक हालचालीत साऱ्या रायगडचा विश्वास आणि हजारो पनवेलकरांचे आशीर्वाद सोबतीला असतील. यशाचा हा प्रवास असा अखंड सुरू राहो हीच सदिच्छा.

---

## कोकणच्या नमन इतिहासात १३ जानेवारी रोजी श्री छत्रपती शिवाजी मंदिरात प्रथमच होणार "फक्त स्त्री पात्रांने नटलेले" नमन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रमोद तरळ) :** कोकणच्या पवित्र मातीत जन्मलेल्या ज्यांचे या मातीवर, इथल्या संस्कृतीवर,इथल्या देवीदेवतांवर खूप श्रद्धा आणि प्रेम आहे म्हणूनच जगाच्या पाठीवर कुठेही जा जर कोकणी माणूस एकमेकांना भेटला तर प्रथम तो आपल्या गावच्या गोष्टी आपुलकीने सर्वांना ऐकवतो, आपल्या गावांची तोंड भरून स्तुति करत असतो असा आहे 'कोकणी माणूस' तर याच कोकणातील कोकणची परंपरा संकृती जोपासण्यासाठी

कलारंग प्रोडक्शन आयोजित अनया फाउंडेशन निर्मित..

आम्ही कोकण कर प्रस्तुत.. दि. १३ जानेवारी २०२६ रोजी दादरमधील श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिरात स्त्री पात्रांने नटलेल्या नमनाचा प्रयोग ठेवण्यात आला आहे




**कोकणचे नमन**

वारसा पूर्वजांच्या पुण्याईचा आपल्या कोकण संस्कृतीचा..!

गायकीची मधुर वाणी ...! त्यात मृदूंगाची थाप....! संकासुराचा नांद...! त्यात रसिकराजाचा आशीर्वाद ..! असा हा चौघडा दाही दिशानी फुलुन होणार रंगमंचावर कोकणच्या बहुरंगी नमनाचा थाट...!

रसिक राजाच्या साक्षीने रंगमंचावर अवतरणार गणरायाचे विश्व रूप ..! भक्तिमय वातावरणात भक्तजन तल्लीन होणार ..सुस्वर भक्ती गीताने मन प्रसन्न होणार.. ...

ज्याच्या बासुरीच्या आवाजाने सारा गोकुळ बेधुंद होऊन नाचू लागतो..!

या त्रिभुवनामध्ये ज्याने प्रेम करायला शिकवले...!

युगे युगे राधा कृष्णाच्या प्रेमाला प्रेमाची उपमा दिले जाते त्या नटखट माखनचोर नंद किशोर कान्हाची रसिकराजाला वेड लावणारी कृष्णलीला

'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे..!

सोबतच कोकणच्या वैभवशाली लाल मातीतील, स्त्री अस्तित्वाच्या प्रवासावर प्रकाश टाकणारी, कौटुंबिक ,सामाजिक, काल्पनिक, प्रबोधनवादी विषयाला गवसणी घालणारी,हृदयस्पर्शी ज्वलंत नाट्यकलाकृती

"वादळ" कहाणी स्त्री शक्तीची लेखक, दिग्दर्शक कृष्णा नंदा शांताराम येद्रे सूत्रधार आनंद संनगरे, रमेश शिरगावकर, मनाली करण अनुराग तुळसकर असून अधिक साठी कृष्णा येद्रे 9773142819 सोनल चव्हाण 95949 74996आनंद सनगरे 86521 41561 मनाली करण 87668 99533 यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे

---

## कृषी शिक्षणातून उलगडली शेतकऱ्याची यशोगाथा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** एम. व्ही. पी. कृषी महाविद्यालय येथील अंतिम वर्षातील विद्यार्थिनींनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत धारणगाव येथे भेट देत यशस्वी उद्योजक शेतकरी शरद पुंड यांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली. या भेटीतून विद्यार्थिनींना शून्यातून उभ्या राहिलेल्या रोपवाटिका व्यावसायिकाचा संघर्षमय व प्रेरणादायी जीवनप्रवास जवळून जाणून घेण्याची संधी मिळाली.या अभ्यासदौऱ्यात विद्यार्थिनी गौरी घारे, श्रुती घोरपडे, स्नेहा जाधव, आरती जगताप, संस्कृती कांगणे, दर्शना कुलथे व स्मृती लगड सहभागी झाल्या होत्या. शरद पुंड यांनी आपल्या जीवनप्रवासाची माहिती देताना सांगितले की, सुरुवातीच्या काळात त्यांनी इतरांच्या शेतात मजुरी करून उदरनिर्वाह केला. शिक्षणाची ओढ कायम ठेवत त्यांनी डिप्लोमा पूर्ण केला; मात्र आई-वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर शेतीकडे वळणे अपरिहार्य झाले. त्या कठीण काळात भावाच्या खंबीर पाठबळावर त्यांनी संघर्षाला सामोरे जात वाटचाल सुरू ठेवली.

प्रारंभी कोणतीही बाह्य मदत नसताना बँकेकडून



कर्ज घेऊन त्यांनी शेतीसोबत रोपवाटिकेचा व्यवसाय सुरू केला. अपार मेहनत, सातत्य आणि योग्य नियोजनाच्या जोरावर आज त्यांची रोपवाटिका यशस्वीपणे कार्यरत असून परिसरातील अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहे. संवादादरम्यान शरद पुंड यांनी संघर्षावर मात करण्याचे महत्त्व, अपयशातून शिकण्याची तयारी, आर्थिक शिस्त तसेच कुटुंबाच्या पाठबळाचे मोल विद्यार्थिनींना समजावून सांगितले. ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत घेतलेली ही मुलाखत भविष्यातील विद्यार्थी, नवोदित शेतकरी आणि तरुण पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# नागपूर महानगरपालिका निवडणूक २०२६ साठी काँग्रेसचा जाहीरनामा प्रकाशित

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी**

**नागपूर :** नागपूर महानगरपालिका निवडणूक–२०२६ साठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा जाहीरनामा आज जाहीर करण्यात आला. या जाहीरनाम्यात काँग्रेसने २४x७ पाणीपुरवठा (महिन्याला ३०,००० लिटरपर्यंत मोफत), ५०० चौ. फु. पर्यंतच्या घरांना मालमत्ता करमाफी, तसेच महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, स्वातंत्र्यसैनिक आणि माजी सैनिकांसाठी मोफत शहर बस सेवा यांसह नागपूरकरांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित १७ हून अधिक जनहितकारी योजना जाहीर केल्या आहेत.

या जाहीरनाम्यात नागपूर महानगरपालिकेत गेल्या १९ वर्षांत भाजपच्या अपयशी कारभारामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा स्पष्ट आणि ठोस उल्लेख करण्यात आला असून, त्या अपयशांवर प्रभावी उत्तर देण्यासाठी काँग्रेसने २० सूत्रांचा सर्वसमावेशक व लोकाभिमुख आराखडा सादर केला आहे. या २० सूत्रांच्या माध्यमातून स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर घडवण्याचा ठाम व निर्धारपूर्ण संकल्प काँग्रेसने व्यक्त केला आहे.मा. हर्षवर्धन सपकाळ, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, यांच्या प्रमुख उपस्थितीत महाकालकर सभागृहात आयोजित कार्यक्रमात काँग्रेसचा जाहीरनामा मराठी व हिंदी भाषेत प्रकाशित करण्यात आला. यावेळी विजय वडेट्टीवार, राज्य विधिमंडळातील काँग्रेस पक्षनेते, कुणाल चौधरी, काँग्रेसचे राज्य सहप्रभारी, रंजित कांबळे, काँग्रेसचे शहर निरीक्षक, विकास ठाकरे, अध्यक्ष, नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी, अभिजीत वंजारी, आमदार, अतुल लोंढे, प्रवक्ते, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, माजी मंत्री अनीस अहमद, माजी आमदार अशोक धवड, दिनेश बनाबकोडे, नागपूर शहरासाठी काँग्रेसचे निवडणूक प्रमुख तसेच इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात काँग्रेसच्या १५१ उमेदवारांना संबोधित करण्यात आले.

काँग्रेसने या जाहीरनाम्यातून दर्जेदार व प्रभावी मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २० सूत्रांचा जनहितकारी आराखडा मांडला असून, स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर घडवण्याचा ठाम संकल्प व्यक्त केला आहे. गेल्या अनेक वर्षांत नागपूरकरांवर वाढविण्यात आलेल्या आर्थिक ओझ्याला दिलासा देत, नागरिककेंद्रित प्रशासन देण्याचा निर्धार काँग्रेसने पुन्हा एकदा अधोरेखित केला.

याप्रसंगी काँग्रेसने आधीच जाहीर केलेल्या Mission 100 काँग्रेस नगरसेवक या अभियानाचा उल्लेख करत, नागपूरच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांच्या आशीर्वादाने हे मिशन यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. काँग्रेसचे सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते एकजुटीने नागपूरकरांच्या हितासाठी काम करतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

जाहीरनामा: काँग्रेसचे २० सूत्र — एकच ध्येय: स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर

- ५०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांसाठी मालमत्ता कर पूर्णतः माफ
- २४x७ अखंड पिण्याच्या पाण्याचा पुरवठा — आणि महिन्याला ३०,००० लिटरपर्यंत पाण्यावर एकही रुपयाचे पाणीबिल नाही
- 'आपली बस' मध्ये ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, माजी सैनिक, स्वातंत्र्यसैनिक व महिलांसाठी मोफत प्रवास
- प्रत्येक घरातून दिवसातून दोन वेळा कचरा संकलन
- NMC, NIT व नझूल लीजवरील प्लॉट्सना मोफत फ्रीहोल्ड
- सर्व झोपडपट्टीधारकांना मोफत मालकी हक्काचे पट्टे
- दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आवश्यक साधने, यंत्रसामग्री व साहित्य मोफत
- BPL कुटुंबांसाठी बाजारपेठांमध्ये मोफत दुकाने व ओट्टे
- पदवीधर युवकांसाठी स्वयंरोजगारासाठी विशेष मोफत योजना




- NMC व NIT मध्ये युवकांसाठी तात्पुरत्या रोजगाराच्या संधी
- Intelligent & Integrated Traffic Management System & Comprehensive Mobility Plan यांच्या माध्यमातून वाहतूक कोंडीमुक्त शहर
- वाहतूक कोंडीतून कायमची मुक्तता
- पूर व पाणी साचण्याच्या समस्येला कायमचा आळा
- शहरातील सर्व रस्ते पूर्णपणे खड्डेमुक्त करणे
- मोफत शिक्षणासह १५१ इंग्रजी माध्यमांच्या शाळांची स्थापना
- शहरातून भांडेवाडी डम्पिंग यार्डचे कायमस्वरूपी स्थलांतर
- आरक्षण जमिनीवरील सर्व अनधिकृत प्लॉट्सना आर.एल. मंजुरी
- डासमुक्त व आरोग्यदायी शहराची उभारणी
- सांडपाणी समस्येचे संपूर्ण व कायमस्वरूपी निराकरण
- १५१ फेरीवाला व खाऊ गल्ल्यांची निर्मिती

**अधिक व्यापक व जनहितकारी संकल्प:**

- प्रमुख चौक व बाजारपेठांमध्ये मोफत वाय-फाय सुविधा
- मॉल्स व शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये मोफत पार्किंग सुविधा
- १५१ नव्या उद्यानांचा विकास
- नाग, पिली, पोरा नद्या तसेच शहरातील सर्व तलावांचे सौंदर्यीकरण (म्युझिकल फाऊंटन व फूड झोनसह)
- स्मार्ट ट्रॅफिक सिग्नलिंग व हायटेक स्ट्रीटलाईट्स
- १५१ नवीन भाजीपाला व मांसाहारी बाजारपेठा
- नियमित झालेल्या सर्व लेआउट्सचे ओपन स्पेसेस व पीयू जमिनींसह नागपूर महानगरपालिकेकडे हस्तांतरण
- सक्रिय नागरिकांच्या सहभागातून प्रभाग समित्यांची स्थापना
- ५ नवीन झोनची निर्मिती
- पुरेशा सार्वजनिक शौचालयांची उभारणी
- नवीन वॉकर स्ट्रीट्सचा विकास
- १५१ नवीन क्रीडांगणांची निर्मिती
- शहरासाठी नवीन विकास आराखडा
- १५ नवीन मॉल्सचा विकास
- मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व वारसा वृक्षांचे संवर्धन
- मोठ्या नाल्यांची नियमित स्वच्छता
- १५१ नवीन ई-लायब्ररी, स्पर्धा परीक्षांसाठी समुपदेशन व प्रशिक्षण केंद्रे
- १५१ नवीन समाजभवन, जिम, योगा शेड्स व ग्रीन जिम्स उभारणीसह विद्यमान समाजभवन व सुविधांचे सर्वांगीण नूतनीकरण
- जिथे वास्तवात गरज आहे, तिथे रेल्वे ओव्हरब्रिज, रेल्वे अंडरब्रिज, नाल्यांवरील मजबूत पूल, उड्डाणपूल तसेच सुरक्षित पादचारी पूल उभारण्यात येतील
- मिहान, कार्गो हब, एसईझेड तसेच नवीन विमानतळ प्रकल्पांची तातडीने पूर्णता
- नवीन घाट, ख्रिश्चन समाजाच्या दफनभूमी व कबरस्तानांचा विकास तसेच विद्यमान सुविधांचे पुनर्विकास.

**नागपूर महानगरपालिकेत गेल्या १९ वर्षांत भाजपच्या अपयशी कारभाराची मुद्देसूद यादी**

- २४x७ पाणीपुरवठा योजना अपयशी; खासगी ऑपरेटर OCW च्या खिशात Rs १,००० कोटी, तर नागरिकांना महागडी पाणीपट्टी आणि अपुरा पाणीपुरवठा.
- दरवर्षी पाणीपट्टी वाढवून नागपूरकरांची लूट.
- कोविड महामारीत रुग्णालयांत खाटा, चाचण्या, ऑक्सिजनचा तुटवडा; शेकडो नागरिकांचा बळी.
- 'आपली बस' सेवा मोडकळीस; कोणताही समन्वय नसलेला Rs १०,००० कोटींचा मेट्रो प्रकल्प—प्रवाशांपेक्षा वाढदिवस साजरे करण्यासाठीच जास्त वापर.
- Rs ३,६०० कोटींचा स्मार्ट सिटी प्रकल्प फक्त फाईलपुरता, शहरात स्मार्टपणा शून्य.
- कचरा कंत्राटदारांच्या खिशात Rs ५०० कोटी, शहरभर कचरा, दुर्गंधी आणि स्वच्छता क्रमांकात घसरण.
- निकृष्ट व भ्रष्ट कामांमुळे सिमेंट रस्ते म्हणजे नागरिकांसाठी दैनंदिन त्रास आणि अपघातांचा धोका.
- पावसाळा आला की नागपूरकरांच्या मनात भीती; वस्त्यावस्त्यांत पाणी साचणे हे नेहमीचेच.
- पथदिवे बंद, रस्ते अंधारात—महिला, ज्येष्ठ आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळ.
- Rs ५०० कोटींचा सीसीटीव्ही प्रकल्प अपयशी.
- Rs २०० कोटींची एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (ITMS) कोलमडली; वाहतूक कोंडी रोजची डोकेदुखी.
- अपुरे नियोजन, भविष्यातील दृष्टीचा अभाव—शहरभर वाहतूक कोंडीचे साम्राज्य.
- स्टेशनरी घोटाळ्यासह महानगरपालिकेत घोटाळ्यांची मालिका, पण जबाबदारी शून्य.
- अंबाझरी उद्यानासह अनेक उद्याने व मनोरंजनस्थळे खासगी लोकांच्या घशात, नागरिकांसाठी बंद.
- खेळमैदाने, उद्याने व सार्वजनिक उपयोग (PU) जमिनी प्रभावशाली लोकांना वाटप—तरुणांसाठी जागाच नाही.
- भूमाफियांचा सुळसुळाट; सामान्य नागरिक असुरक्षित.
- झोपडपट्टीवासीयांना आजही मालकी हक्क पट्ट्यांपासून वंचित ठेवले.
- नियमितीकरण केलेले लेआउट्स महानगरपालिकेकडे न दिल्याने नागरी सुविधा रखडल्या.
- नागरिकांना महानगरपालिका व NIT या दोन यंत्रणांत हेलपाटे—एकही जबाबदार नाही.
- खड्ड्यांनी भरलेले रस्ते; पावसाळ्यात परिस्थिती अधिक भयावह.
- नाग, पिली, पोरा नद्या व तलावांचे पुनरुज्जीवन केवळ घोषणांपुरतेच; प्रत्यक्षात अपयश.
- एकही नवा भाजी बाजार, एकही मॉल नाही—शहराचा नियोजित विकास ठप्प.

* खाऊ गल्ली सुरू होण्याआधीच बंद करण्यात आली.

- बिल्डरधार्जिण्या धोरणांसाठी फेरीवाल्यांवर अत्याचार; मध्यमवर्गीय व गरीब जनतेचे हाल.
- डासजन्य व विषाणूजन्य आजारांवर नियंत्रण नाही; आरोग्य यंत्रणा कोलमडलेली.
- रस्ते, अंतर्गत रस्ते व रेल्वे अंडरब्रिजमध्ये सांडपाण्याचे साम्राज्य.
- ओपीडी, निदान व उपचार सुविधांचा अभाव; सामान्य नागरिक खासगी रुग्णालयांच्या लुटीला बळी.
- मराठी, हिंदी व उर्दू माध्यमांच्या शाळा बंद; इंग्रजी माध्यमांच्या नव्या शाळा सुरू करण्यात अपयश—शिक्षणाचा घसरता दर्जा.

## जोगेश्वरीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व हरपले – प्रविण गजानन शिंदे (बापू) यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** जोगेश्वरी परिसरातील सर्वसामान्य जनतेचा खंबीर आधार, प्रत्येक घरातील आपुलकीचे नाव आणि समाजासाठी सदैव झटणारे प्रविण गजानन शिंदे ऊर्फ बापू यांचे सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले. होली स्पिरिट रुग्णालयात उपचार सुरू असताना रात्री त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण जोगेश्वरी परिसरात शोककळा पसरली.

बापू हे केवळ नाव नव्हते, तर विश्वासाचे प्रतीक होते. कोणत्याही प्रकारची आपत्ती असो, रुग्णांना मदत असो, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न असोत किंवा एखाद्या गरजू कुटुंबावर आलेले संकट असो—"बापू आहेत" ही भावना नागरिकांना धीर देणारी




होती. कोणताही भेदभाव न करता, जात-पात, धर्म, राजकारण यापलीकडे जाऊन त्यांनी नेहमीच माणुसकी जपली.त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ, मनमिळावू व मदतीस तत्पर होता. अनेक गरजू रुग्णांना उपचारासाठी मदत, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मार्गदर्शन, तसेच आपत्कालीन प्रसंगी तातडीने धाव घेणे हे त्यांच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य अंग होते. त्यामुळेच जोगेश्वरीतील प्रत्येक घराशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते.

बापूंच्या निधनानंतर परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत श्रद्धांजली अर्पण केली. अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करताना, "आज आम्ही आमचा माणूस गमावला" अशा शब्दांत दुःख व्यक्त केले.

त्यांच्या पश्चात कुटुंबीय, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि असंख्य चाहत्यांचा मोठा परिवार आहे.

बापूंच्या निधनाने जोगेश्वरीने एक प्रेमळ मार्गदर्शक, निस्वार्थ समाजसेवक आणि माणुसकीचा दीपस्तंभ गमावला आहे. त्यांच्या कार्याची आणि आठवणींची प्रेरणा कायम समाजात जिवंत राहील.


भावपूर्ण श्रद्धांजली.

## महाराष्ट्रात केनडियरने व्यवसाय विस्तारीत केला

### मुंबई-कांदिवली, नाशिक आणि कोल्हापूर येथे तीन नवीन आउटलेट्स सुरू केली

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :** कल्याण ज्वेलर्सचा लाइफस्टाइल ज्वेलरी ब्रँड, केनडियरने महाराष्ट्रात रिटेल विस्तारात आणखी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. आधुनिक आणि ट्रेंडी डिझाइनसाठी प्रसिद्ध असलेल्या या ब्रँडने कांदिवली, नाशिक आणि कोल्हापूर येथे तीन नवीन आउटलेट्स सुरू केली आहेत. त्यामुळे आता केनडियरची सर्वात नवीन व स्टायलिश डिझाइन्स आता तुमच्या शहरात उपलब्ध आहेत, ज्यामुळे प्रत्येक ग्राहकाला आपली आवड पूर्ण करता येणार आहे. आजच्या ग्राहकांना त्यांच्या आवडीचे, उत्कृष्ट आणि परवडणारे दागिने खरेदी करण्याचा अनुभव देणे हे ब्रँडचे ध्येय आहे.

केनडियर आता महाराष्ट्रातील प्रमुख शहरे आणि नव्याने विकसित होत असलेल्या भागात आपली उपस्थिती वाढवत आहे. ही तीन नवीन दुकाने महाराष्ट्रात ब्रँडच्या




वाढत्या रिटेल विक्रीची प्रतीके आहेत. नवीन आउटलेट्स मध्ये डिजिटल-फर्स्ट सुविधा आणि प्रत्येक ग्राहकाला वैयक्तिक सेवा यांचा उत्तम मिलाप आढळून येतो. येथे भेट देणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला सौंदर्य, नावीन्य आणि विलासी अनुभव प्रदान करण्याचे केनडियरचे वचन प्रतिबिंबित करण्यासाठी ही स्टोर्स डिझाइन करण्यात आली आहेत.

वजनाला हलक्या, बहुमुखी आणि ट्रेंड-फॉरवर्ड दागिन्यांसाठी ओळखले जाणारे केनडियर हे आजच्या जेन-झी आणि प्रोफेशनल्सची पसंती आहे. १०,००० रुपयांपासून सुरू होणाऱ्या आधुनिक डिझाइनसह, केनडियरचा प्रत्येक दागिना तुमची ओळख आणि शैली उत्तम प्रकारे दर्शवतो. ब्रँड हे सुनिश्चित करतो की दागिने केवळ सजवत नाहीत तर तुमच्या जीवनशैली आणि व्यक्तिमत्त्वाचा भाग देखील बनतात.

कांदिवली, नाशिक आणि कोल्हापूरमध्ये नवीन आउटलेट्स सुरु करून, केनडियरने आपल्या डिजिटल व रिटेल उपस्थितीचा उत्तम ताळमेळ तसेच एक ओम्नी-चॅनेल लाइफस्टाइल ज्वेलरी ब्रँड हे आपले व्हिजन आणखी मजबूत केले आहे. कल्याण ज्वेलर्सच्या विश्वासासह, केनडियरने दागिन्यांच्या खरेदीची नवी व्याख्या रचली आहे! तुमची दागिने खरेदी आता होईल अधिक स्मार्ट, सोपी आणि अधिक आलिशान अनुभवांनी परिपूर्ण.

## स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक २० मध्ये महायुतीचा जोरदार प्रचार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 20 च्या भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या उमेदवार श्वेता सुनील बहिरा यांच्या प्रचारासाठी भिंगारी येथील एकविरा झोपडपट्टी मधल्या महिला मंडळाची बैठक घेतली.



त्यावेळी त्या बैठकीला पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहराध्यक्ष प्रशांत सोनवणे, पनवेल शहर महिला आघाडीच्या अध्यक्ष ममताज पठाण यांच्यासोबत सुमन पाटील, रेहाना अन्सारी ,पुतुल अन्सारी, फातिमा शेख ,रखमाबाई पाटील ,कविता ठाकूर ,आफरीन पठाण ,खोणी देवी साह, आसरा तारा अन्सारी, रिटा देवी , खुशबू खान , सायरा बानू, कुरेशा अन्सारी, सलमा अन्सारी व इतर महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या या महिला आघाडीच्या सर्व महिला पदाधिकारी या वार्ड क्रमांक 20 मध्ये घरोघरी जाऊन भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या उमेदवार श्वेता बहिरा यांचा जोरदार प्रचार करणार आहेत.

## महिला पैलवान फातिमा सिकंदर शेख हिचे अजिंक्यस्पद स्पर्धेत यश

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील श्री छत्रपती व्यायाम शाळा भवानीनगर येथील वस्ताद राजेंद्र गावडे यांची पट्टी महिला पैलवान फातिमा सिकंदर शेख हिचा 50 किलो वजनगटातुन पुणे जिल्हा निवड चाचणीत पिंपळे दुमला येथे झालेल्या महिला महाराष्ट्र केसरी अजिंक्यस्पद स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक मिळवून पूणे जिल्यात वेगळाच ठसा उमटवला आहे. वडील पै सिकंदर शेख यांच्या प्रेरणेतुन पै फातिमा शेख या कुस्ती क्षेत्रात उतरली आहे. तसेच भवानीनगर येथील पै सौरभ टकले व पै बजरंग माने यांनी बारामती येथे झालेल्या तालुकस्तरीय झालेल्या कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक व दुतीय क्रमांक मिळवला वरील पैलवान गुरुवर्य लालासाहेब गावडे व वस्ताद पै राजेंद्र गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री छत्रपती व्यायामशाळा भवानीनगर येथे सराव करत असून आपल्या भागातील पैलवानानी लहान वयात छान कामगिरी केली असल्यामुळे श्री छत्रपती कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक सरपंच यशवंत भाऊ नरुटे पाटील व मित्र परिवार यांच्याकडून महिला पैलवानाचे विशेष कौतुक करून अभिनंदन करण्यात आले.



## फुले फेस्टीव्हल मध्ये वैष्णवी कोकरे यांना कविता सादर करण्याचा मान देण्यात आला

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी सतिश लोखंडे :** दिनांक २ ते ५ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथे आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवलचे आयोजित करण्यात आले होते . यामध्ये विविध प्रकारचे सादरीकरण सादर करण्याचा मान सन्मान आयोजक भिडे वाडकर सविंधानधुत मा .विजय वडवेराव सर यांनी काव्य जागर करण्याऱ्यांना दिले होते. यामध्ये कवी. वैष्णवी कोकरे यांना दिनांक ४ जानेवारी.रोजी बहुमान देण्यात आला होता. यामध्ये आकर्षित सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र , भारतीय संविधान, असे सहभागी कविना भेट देण्यात आले.व आकर्षित सुंदर व प्रेरणादायी मोफत रुचकर जेवणाची सुध्दा व्यवस्था करण्यात आली होती. व तसेच मंचावर शालेय विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम लक्ष वेधून घेणारा होता.व लहान मुलांन पासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी सहभागी झाले होते. चार दिवस चालणारा फुले फेस्टीव्हल हा नवं कविसांठी प्रेरणादायी ठरला . व आयोजकांनाचे आभार मानावे तेवढे थोडेच होते शिस्तबद्ध कार्यक्रम दिसून आला.



वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी पुस्तकांशी मैत्री करा !

# जय भवानीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत भव्य ग्रंथप्रदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी) :** पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा ग्रंथालय विभागाच्या वतीने दिनांक ०१ - ०२ जानेवारी २०२६ रोजी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात भव्य ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले होते. या वेळी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर,गढी चे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे, प्रा.डॉ.सुनील जाधव, प्रा.सोमनाथ घाडगे हे उपस्थित होते तर महाविद्यालयीन समिती सदस्य ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे, प्रा.डॉ.वंदन जाधव, प्रा. बापू घोक्षे, अंतर्गत मूल्यमापन समितीचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.लोखंडे बंडू, प्रा. डॉ.शिवाजी काकडे, कनिष्ट विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे, प्रा.सतीश जरांगे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी ग्रंथ प्रदर्शनामागील भूमिका स्पष्ट केली. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या मोहिमेद्वारे महाविद्यालयात एक समृद्ध वाचन संस्कृती रुजवून, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे आणि त्यांना ज्ञानाधिष्ठित समाजाचे जबाबदार घटक बनवणे, हे या उपक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे असे सांगितले.



उद्घाटनाप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम म्हणाले कि, आजच्या डिजिटल आणि वेगवान युगात युवा पिढीचा कल पुस्तकांपेक्षा स्क्रीनकडे अधिक वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्याची प्रत्यक्ष ओळख करून देऊन त्यांच्यात वाचनाची अभिरुची पुन्हा निर्माण करणे तसेच पुस्तके ही केवळ माहितीची साधने नसून ती विद्यार्थ्यांची वैचारिक प्रगल्भता आणि चरित्र घडवणारे सच्चे मित्र आहेत. या ग्रंथ प्रदर्शनात वाचनीय पुस्तके, विविध संदर्भग्रंथ, कथा, कादंबरी ठेवण्यात आले होते. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयातील ग्रंथसंपदा वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली. सदर वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत ०१ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा राबविण्यात येणार असून या उपक्रमाच्या माध्यमातून प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, सामुहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा या सारखे अनेक उपक्रम या दरम्यान घेण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.लोखंडे बंडू यांनी मानले. या ग्रंथ प्रदर्शनात सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी तसेच वाचकांनी आपला सहभाग नोंदवला.

# वसई–नालासोपारा–विरार कुंभार समाज मंडळातर्फे समाज भूषण पुरस्कार २०२६ प्रदान

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर,मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** वसई–नालासोपारा– (शहर) कुंभार समाज मंडळाच्या वतीने देण्यात येणारा "समाज भूषण पुरस्कार २०२६" हा मानाचा पुरस्कार सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री. कृष्णा गोविंद चिंदरकर गुरुजी यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार आज दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आला असून समाजातील विविध स्तरांतून गुरुजींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्री. कृष्णा गोविंद चिंदरकर गुरुजी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून समाजप्रबोधन, नैतिक मूल्यांची जोपासना, धार्मिक कार्य, सामाजिक सलोखा आणि युवक मार्गदर्शन यासाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या निस्वार्थ सेवाभावाची दखल घेत वसई–नालासोपारा–विरार कुंभार समाज मंडळाने त्यांची "समाज भूषण पुरस्कार २०२६" साठी निवड केली आहे.

कुंभार समाजाच्या एकतेसाठी,







समाजातील गरजू घटकांना मार्गदर्शन व सहकार्य करण्यासाठी गुरुजींचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. धार्मिक प्रवचने, सामाजिक उपक्रम तसेच समाजातील अंधश्रद्धा व वाईट प्रथा दूर करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी जनजागृती केली आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडून येत असून तरुण पिढीला योग्य दिशा मिळत आहे. या पुरस्काराबद्दल भावना व्यक्त करताना श्री. कृष्णा गोविंद चिंदरकर गुरुजी म्हणाले, "हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून संपूर्ण समाजाच्या विश्वासाचा आणि प्रेमाचा आहे. पुढील काळातही समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करत राहीन."

याच कार्यक्रमात समाजातील गुणवंत विद्यार्थिनींचाही सन्मान करण्यात आला. भाग्यश्री संजय जिकमडे हिने आपल्या मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी चार्टर्ड अकाउंटंट (C.A.) ची अंतिम परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल वसई–नालासोपारा–विरार कुंभार समाज मंडळाच्या वतीने तिला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. भाग्यश्रीच्या या यशामुळे समाजातील तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी ती एक प्रेरणास्थान ठरत आहे.कार्यक्रमात समाज मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करताना, अशा पुरस्कारांमुळे समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण होते, असे मत व्यक्त केले. यावेळी समाजातील विविध मान्यवर, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.वसई - नालासोपारा - विरार (शहर) कुंभार समाज मंडळाच्या वतीने मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सन्मानीय श्री. महेशदादा भागीरथी दगडू सायकर यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . हा अतिशय आनंददायी क्षण....

हा सन्मान दादांनी त्यांच्या मातोश्रींच्या चरणी समर्पित केला ....!!!या पुरस्कार सोहळयाला समाजातील व प्रशासनातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये सन्मा. श्री. अजित कुमार (I. A. S), C. E.O., MIDC, Mumabai मुख्य कार्यकारी अधिकारी, सौ. मनीषाताई कुंभार, (अप्पर जिल्हाधिकारी, मैत्री उद्योग विभाग, मुंबई ) सन्मा. श्री. सतीशदादा देरेकर, ( संस्थापक- कुंभार समाज सामाजिक संस्था, महाराष्ट्र प्रदेश ) सन्मा. श्री. रमाकांतजी क्षीरसागर, ( प्रदेश अध्यक्ष-कुंभार समाज सामाजिक संस्था, महाराष्ट्र प्रदेश ) आदी प्रमुख मान्यवरांचा समावेश होता.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीला उजाळा

## पत्रकार उत्कर्ष समितीकडून नवी मुंबईत लेखणीच्या योद्धयांचा यथोचित सन्मान

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून ६ जानेवारी २०२६ रोजी नवी मुंबईतील खारकोपर येथे" गौरव लेखणीचा सन्मान आपल्या कर्तृत्वाचा" हा भव्य सोहळा अत्यंत दिमाखात संपन्न झाला. पत्रकार उत्कर्ष समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात पत्रकारिता क्षेत्रात अहोरात्र झटणाऱ्या निधड्या छातीच्या पत्रकारांना सन्मानित करण्यात आले.

खारकोपर रेल्वे स्थानकाजवळील जोमा नारायण घरत समाज मंदिर सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.पत्रकार उत्कर्ष समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष





डॉक्टर अशोक लक्ष्मण म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे नेटके नियोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा श्री महेंद्रजी घरत यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाची सुरुवात महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी पत्रकारांना मार्गदर्शन करताना महेंद्रजी घरत त्यांनी पत्रकारितेचे समाजातील स्थान अधोरेखित केले पत्रकार लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ आहे संकटाच्या काळातही आपली लेखणी जिवंत ठेवून समाजाला न्याय देण्याचे काम पत्रकार करतात असे शब्दांत त्यांनी पत्रकारांचे कौतुक केले .त्यांचे शुभहस्ते पत्रकरिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारा पत्रकारांना सन्मानित करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर समितीचे राज्यसचिव डॉ. वैभव पाटील ,खजिनदार शैलेश ठाकूर, सहसचिव ज्ञानेश्वर कोळी ,सदस्य रोहिदास जाधव ,दिलीप गायकर आदी मान्यवर उपस्थित होते. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील अन्यायाला वाचा फोडणाऱ्या आणि जनहित जपणाऱ्या पत्रकारांना यावेळी गौरविण्यात आले. समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या निष्ठेचा आणि परिश्रमाचाही यावेळी सन्मान करण्यात आला. पत्रकार उत्कर्ष समिती महिला समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्याहि यावेळी उपस्थित होत्या त्यांचाही सन्मान करण्यात आला .

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानताना एक वेगळीच ऊर्जा पाहायला मिळाली .पत्रकार हे समाजाचा कणा आहे, आणि त्याच्या सन्मानाने लोकशाहीचे मूल्य अधिक घट्ट होतात अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. रामशेठ ठाकूर स्टेडियम परिसरातील या सोहळ्याने केवळ पत्रकारांचा गौरवच नाही तर बदलत्या काळातही लेखणीची ताकद शाबूत असल्याचा संदेश संपूर्ण नवी मुंबई व रायगडला दिला गेला अत्यंत शिस्त , प्रेरणादायी वातावरणात पार पडलेला सोहळा उपस्थित पत्रकारांसाठी एक अविस्मरणीय ठेवा ठरला. लेखणीचा सन्मान हाच आमचा स्वाभिमान हा संदेश देत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या विचारांची मशाल तेवत ठेवत प्रेरणादायी कार्यक्रमाची सांगता झाली .एक सुंदर आणि शिस्तबद्ध आयोजन म्हणून या कार्यक्रमाची चर्चा संपूर्ण परिसरात रंगली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोफेसर अक्षय पाटील यांनी आपल्या रंजक शब्दांत आणि खड्या आवाजात केली कार्यक्रमला उंचीवर नेले.

# ठाण्यातील निवडणूक निर्णय अधिकारी अडचणीत

## आयोगाने पालिका आयुक्त, निरीक्षकाकडून अहवाल मागवला

**ठाणे :** मनमानी पद्धतीने काम केल्यावरून मुंबईप्रमाणेच ठाण्यातील एक निवडणूक निर्णय अधिकारी वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. उमेदवारांचे अर्ज पडताळणीसाठी सार्वजनिकरित्या उपलब्ध करुन देण्यात हयगय करतानाच सत्ताधाऱ्यांचे उमेदवार बिनविरोध निवडूण येण्यासाठी मदत केल्याच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आरोपांची राज्य निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेत या प्रकरणी पालिका निवडणूक निरीक्षक आणि महापालिका आयुक्तांकडून अहविला मागविला आहे.ठाणे महापालिकेच्या वागळे इस्टेट निवडणूक केंद्राच्या निवडणूक निर्णय अधिकारी वृषाली पाटील यांच्या कार्यपद्दतीवर मनसेने आक्षेप घेत त्यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अंतर्गत येणाऱ्या पालिका प्रभाग क्रमांक १६,१७ आणि १८ मधून शिवसेनेचे(शिंदे) उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. मात्र अर्ज छाननी आणि माघार घेण्याच्या प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियमबाह्य काम केल्याचा आरोप मनसेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांनी केला आहे.जाधव यांनी सोमवारी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेऊन निवडणूक निर्णय अधिकारी वृषाली पाटील यांच्यावर कारवाईची मागणी केली. उमेदवारांचे अर्ज पडताळणीसाठी सार्वजनिकरित्या दुपारी साडेतीन वाजेपर्यंत उपलब्ध करण्यात आले नव्हते. हे पाटील यांनी स्वत: मान्य केले असून सत्ताधारी पक्षाच्या एकाही उमेदवाराचा अर्ज बाद झाला नाही आणि विरोधी पक्षातील एकही उमेदवार बिनविरोध निवडून आलेला नाही. हा सरळ सरळ भ्रष्ट मार्गाचा अवलंब असून मतदारांची घोर फसवणूक आहे. त्यामुळे अशा भ्रष्ट अधिकारीची तत्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी जाधव यांनी निवडणूक आयुक्तांकडे केली आहे. तसेच ठाण्यामधील बिनविरोध निवडून आलेल्या सर्व घटनाक्रमाचा लेखाजोखाही आयुक्तांसमोर मांडला.

**नियोजनाअभावी कल्याण डोंबिवलीचा उकिरडा**

निवृत्त न्यायाधीश व उच्चपदस्थ पोलीस अधिकारी यांची संयुक्त समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी होईपर्यंत सर्व बिनविरोध उमेदवारांचे निकाल राखून ठेवण्याची मागणीही जाधव यांनी केली. याबाबत राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याशी संपर्क साधला असता, ठाण्यातून आलेल्या तक्रारीची आयोगाने दखल घेतली असून पालिका निवडणूक निरीक्षक पी. वेलारासू आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडून अहवाल मागविण्यात आल्याचे सांगितले.

# पत्रकारिता : लोकशाही हिताची तलवार - सुरक्षेची ढाल

पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे सुध्दा.त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते.पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो.दिनांक २० फेब्रुवारी १८१२ ला बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म पोंभुर्ले देवगड,तालुका सिंधुदुर्ग येथे झाला व मराठी जगतात लखलखता तारा उदयास आला.मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ६ जानेवारी १८३२ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र जांभेकरांनी सुरू केले या दिनाचे स्मरण सर्वांना रहावे म्हणून ६ जानेवारी दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे "द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म" या रूपाने सुध्दा ओळखले जाते.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखाण करने.कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी कोणाच्याच लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे. म्हणूनच जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला "चौथास्तंभ" ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो. १९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते.

पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ



प्रकाशित केल्या जाते. पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविने. आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया, ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात "चौथास्तंभ".पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात "पत्रकारितेची शैली". पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण(धारधार) लीखाण केल्या जाते. यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते. कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे, चंद्र-सुर्य, चंद्रयान यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो. तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी "दर्पण" नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.

मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे "दर्पण" हे मराठीतील "पहिले वृत्तपत्र"होय.त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी "दर्पण"मध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा "संवाद कौमुदी" टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' डॉ बाबासाहेब आंबेडकर याचे "मुकनायक" ही सर्व वृत्तपत्रे "आर्थीक तोटा" सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती. त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात. याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही इजा होऊ दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. ६ जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १२० ■ बुधवार, ०७ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

त्वरित पत्रकार पाहिजेत !
महाराष्ट्र व देशासह जगभरात डिजिटल माध्यमातून पोहचणारे दैनिक युवक आधार
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे,तालुका, जिल्हा परिषद सर्कल,लोकसभा, विधानसभा या ठिकाणी पत्रकार पाहिजेत
श्री संतोष शिवदास आमले

